






# एकलव्याचा अंगठा



स्वामी अडगडानन्दजी

।। ॐ नमः सद्‌गुरुदेवाय ।।

# एकलव्याचा अंगठा

लेखक

**परमपूज्य श्री परमहंस महाराज का कृपा-प्रसाद**

**स्वामी श्री अड़गड़ानन्द जी**

श्री परमहंस आश्रम

ग्राम-पत्रालय- शक्तेषगढ़, जिला-मिर्जापुर, उ०प्र०, भारत

फोन : (०५४४३) २३८०४०

प्रकाशक :

**श्री परमहंस स्वामी अड़गड़ानन्दजी आश्रम ट्रस्ट**

न्यू अपोलो ईस्टेट, गाळा नं. ५, मोगरा लेन,(रेलवे सब-वे च्या जवळ),

अंधेरी पूर्व, मुम्बई - ४०००६९

# भूमिका

परमतत्त्वाची प्राप्ती झालेल्या महापुरुषांची वाणी अलौकिक असते. कोणी कितीही ज्ञानी असला तरी संसारात प्राप्त केलेल्या लौकिक ज्ञानाच्या बळावर साक्षात्कारी पुरुषांच्या वाणीचा अर्थ ते जाणू शकत नाही. कारण चित्तवृत्तीच्या निरोधाबरोबर मिळणारा ईश्वरी संदेश लिहिला जात नाही. कारण तो वाणीचा विषय नाही तो अनिर्वचनीय आहे. मात्र ईश्वरीय संदेश जाणण्याचा एक संकेत आहे जो ऐकण्यास रुचत नाही, जो विरोधाभासी वाटतो. उदाहरणार्थ रामचरित मानसमध्ये सांगितले आहे-

**उमा राम गुन गुढ, पंडित मुनि पावहिं विरति।**
**पावहिं मोह विमूढ, जे हरि विमुख न धर्मरति।।**

रामाचे गुण जाणण्यास गहन आहेत. रामाचे गुण जाणणारे जे ज्ञाते आहेत, त्यांची मनासहित सर्व इंद्रिये स्तब्ध म्हणजे मौन झालेली असतात. सर्व इंद्रिये अनासक्त झालेली असतात. तेच परमात्म्याची सत्यता जाणतात. हे लोक या संसारातील असत्यतेचा त्याग करतात. परंतु जे मूर्ख असतात, जे हरीचरणापासून विन्मुख असतात, सत्य धर्मावर ज्यांची श्रद्धा नसते असे लोक त्यांच्या चरित्रापासून चुकीचा अर्थ घेतात. लेखन एकच असले तरी त्याचे अर्थ ग्रहण करण्याची पात्रता दोन प्रकारची असते. एक अर्थ प्रकाशाकडे घेऊन जाणारा असतो. तर दुसरा अंधाराकडे घेऊन जाणारा असतो. म्हणून गोस्वामी 'मानस' समजण्याची क्षमता कोणात असते हे सांगत असताना म्हणतात-

**यह शुभ चरित जान पै सोई। कृपा राम की जापर होई।।**

ज्यांच्यावर रामाची प्रत्यक्ष कृपा होते तेच रामाच्या गुणाचे रहस्य जाणतात.

**यह चरित्र जानहिं मुनि ज्ञानी। जिन्ह रघुवीर चरन रति मानी।।**

मानस काय सांगते ते केवळ मुनी आणि ज्ञानीच जाणतात. त्यांचे मन त्या अपौरुषेय परमतत्त्वात लीन झालेले असते. त्यामुळे असे ज्ञानीच मानसचा खरा अर्थ जाणतात. नुसत्या रामायणाच्या गोष्टी करण्याने रामायण समजत नाही.

जर अंतरंगात एखादा प्रश्न उसळत असेल तर एखाद्या तत्वदर्शी महापुरुषाला भेटून प्रश्नाचे समाधान करुन घेतले पाहिजे. या संदर्भात आमच्याकडे आल्यास आपले स्वागतच होईल.

मनात प्रश्न निर्माण होणे हे ज्ञानी माणसाचे लक्षण असते असे पूज्य गुरुदेव म्हणत असत. पंरतु ज्याच्याकडे त्या प्रश्नाबाबत समाधान होईल त्यालाच प्रश्न  विचारावे. जंगलात जाऊन जर कोणी विमान किंवा पासपोर्ट मिळण्याची इच्छा केली तर कोठून मिळणार? तेथे तर गवत व वनस्पतीच मिळणार. तेव्हा प्रश्नांचे समाधान करण्यासाठी थोडा प्रयत्न करावा. संताच्या संगतीत रहावे व त्यांच्यावर दृढ श्रद्धा ठेवावी.

**जे श्रद्धा सम्बल रहित, नहि सन्तन कर साथ।**
**तिन्ह कहँ मानस अगम अति, जिन्हहिं न प्रिय रघुनाथ।।**

मग ते महापुरुष भक्ताच्या हृदयातच मार्गदर्शन करतात. भक्ताच्या प्रश्नाचे उत्तर देतात की ज्याच्यामुळे अंतरंगात उसळणाऱ्या प्रश्नांचे समाधान होते.

।।ॐश्री सद्‌गुरु भगवान की जय।।

(स्वामी अडगडानन्द)

# शिक्षण देणारे गुरु
# आणि
# सद्‌गुरु यांच्यातील
# फरक

शिक्षक जीवन जगण्याची कला
शिकवतात, तर सद्‌गुरु जीवनात समृद्धी
देतात आणि त्याबरोबरच परमश्रेयाची
जागृती व अनामय पदाची प्राप्ती करुन
देतात.

# गुरु-वन्दना

**।। ॐ श्री सद्‌गुरुदेव भगवान् की जय ।।**

जय सद्‌गुरुदेवं, परमानन्दं, अमर शरीरं अविकारी।
निर्गुण निर्मूलं, धरि स्थूलं, काटन शूलं भवभारी।।

सूरत निज सोहं, कलिमल खोहं, जनमन मोहन छविभारी।
अमरापुर वासी, सब सुख राशी, सदा एकरस निर्विकारी।।


अनुभव गम्भीरा, मति के धीरा, अलख फकीरा अवतारी।
योगी अद्वैष्टा, त्रिकाल द्रष्टा, केवल पद आनन्दकारी।।

चित्रकूटहिं आयो, अद्वैत लखायो, अनुसुइया आसन मारी।
श्री परमहंस स्वामी, अन्तर्यामी, हैं बड़नामी संसारी।।

हंसन हितकारी, जग पगुधारी, गर्व प्रहारी उपकारी।
सत्-पंथ चलायो, भरम मिटायो, रूप लखायो करतारी।।

यह शिष्य है तेरो, करत निहोरो, मोपर हेरो प्रणधारी।
जय सद्‌गुरु.........भारी।।

**।। ॐ ।।**




श्री श्री १००८ श्री स्वामी परमानन्दजी महाराज ( परमहंसजी )
जन्मः शुभ सम्वत् विक्रम १९६९ ( १९११ ई. )
महाप्रयाण ज्येष्ठ शुक्ल ७, २०२६, दिनांक २३/०५/१९६९ ई.
परमहंस आश्रम अनुसुइया, चित्रकूट



श्री स्वामी अड़गड़ानन्द जी महाराज

# एकलव्याचा अंगठा

'यथार्थ गीता' या श्रीमद् भगवद्गीतेवरील भाष्याच्या ऑडियो कॅसेटचा लोकार्पण सोहळा महामहीम राष्ट्रपतींच्या हस्ते नुकताच पार पडला. त्या संदर्भात काही पत्रकारांशी आम्ही चर्चा करीत असतानाच 'एकलव्य सेना' संघटनेच्या उद्‌घाटन सोहळयाच्या एका सन्माननीय आयोजकाने (जे आमच्या आश्रमातील भक्तांपैकी एक आहेत) आम्हांला विनंती केली की, या कार्यक्रमाच्या उद्‌घाटन समारंभात आम्हीही दोन वाक्ये बोलावीत.

वास्तविक कार्यक्रमाला हजर राहण्यासाठी येत असताना आमच्या कानावर काही घोषणा पडल्या... ''आता आम्ही अंगठा देणार नाही!'' एकाने तर आमच्याजवळ येऊन तक्रारही केली... ''महाराजश्री, आम्ही आपल्यासारख्यांच्या जवळ कसे यावे? आमच्या पूर्वजांपैकी एकजण आला तर गुरुवर्यांनी त्याचा अंगठाच घेऊन टाकला.''

आपला हा प्रश्न फार मार्मिक आहे. आक्रोशही स्वाभाविकच आहे. अर्धवट ज्ञानच पूर्ण ज्ञानाच्या प्राप्तीची प्रेरणा देत असते. अर्थात, कोणत्याही एखाद्या कार्यक्रमामध्ये या प्रश्नावर चर्चा करणे किंवा उत्तर देणे योग्य नव्हे. तरीदेखील आपल्या सर्वांच्या आग्रहास्तव मी उत्तर देण्याचा प्रयत्न करीत आहे.

आचार्य द्रोणांनी तर नुसताच अंगठा मागून घेतला; पण दुसऱ्या एका आचार्याने तर कर्णाचे प्राणच घेतले. तर एका विद्वान आचार्याने राजकुमारी शर्मिष्ठेला दासी बनवले. या आचार्यांना काय म्हणायचे? या आचार्यांनीच स्मृतीची रचना करुन भारताला जवळजवळ संपवून टाकले.

वास्तविक सद्‌गुरु व आचार्य गुरुमध्ये फरक करण्याचे लोक विसरुन गेले व तेच आपल्या शंकेचे व जगाला व्यापून असणाऱ्या अनर्थांचे मूळ कारण आहे. सामाजिक मर्यादेने वेढले गेलेले गुरु काहीही करु शकतात. जे शिक्षण देतात त्यांना आचार्य-शिक्षक म्हटले जाते. या शिक्षणात धनुर्वेद, आयुर्वेदापासून मूळाक्षराच्या ज्ञानापर्यंत सर्व कलांचा समावेश होतो. सारांश या सृष्टीत मानवी जीवनाला उपयुक्त अशा जेवढ्या कला आहेत त्या सर्व कलांचा समावेश होतो.

एका पौराणिक आख्यानानुसार प्रजापती कश्यपाला दोन राण्या होत्या. एकीचे नाव होते दिती व दुसरीचे नाव होते आदिती. दितीपासून दानवांचा आणि आदितीपासून देवतांचा जन्म झाला. या दोन सवतींच्या भांडणामुळे त्यांच्या मुलांमध्येही स्वतःच्या आईवरुन भांडणे होऊ लागली. या विवादापासून दोघानांही दूर ठेवण्यासाठी कश्यपाने त्यांना दोन वेगवेगळया भू-भागात ठेवले. तरीही देव व दैत्यांमध्ये कधीही सुमेळ झाला नाही.

त्या दोघांमधील द्वेष-ईर्ष्या प्रज्वलित होण्यास आणखी एक घटना खूप कारणीभूत झाली.

ती म्हणजे बृस्पतींची देवतांचे आचार्य म्हणून केलेली नियुक्ती. शुक्राचार्य त्या युगातील श्रेष्ठ विद्वान होते. त्यांना आपला हा अपमान वाटला व म्हणून त्यांनी असुरांचे आचार्यपद स्वीकारले. या दोन आचार्यांच्या प्रतिद्वंद्वामुळेच देवासुरांचे वारंवार संघर्ष झालेले दिसून येतात.

**आचार्य बृहस्पती**

देवगुरु बृहस्पती अत्यंत तीक्ष्ण बुध्दीचे होते. शक्तीपेक्षा बुद्धीवर व कुटनीतीवर त्यांचा आधिक विश्वास होता. मदान्ध झालेल्या नहुषापासून देवराज इंद्रपत्नी शचीचे त्यांनी आपल्या बुद्धिकौशल्यानेच रक्षण केले होते.

याच नहुषाने शंभर यज्ञ करुन इंद्रपद प्राप्त केले होते. सुरुवातीस तो अत्यंत धर्मप्रवण होता; परंतु इंद्रपदावर आसनस्थ झाल्यावर जेव्हा वरुण, अग्नी, काळ यम, वायू व चंद्रादि देवता त्याला वंदन करायला आल्या तेव्हा त्याला फार गर्व झाला. त्याला वाटू लागले की या सर्वांपेक्षा आपण प्रभावशाली आहोत. तेवढ्यात त्याला इंद्राची आठवण झाली. तो का नाही आला? तो कोठे आहे? त्याला समजले की तो तपश्चर्या करायला गेला आहे. तेव्हा नहुष म्हणाला, ''इंद्र नाही तर नाही त्याची पत्नी तर आहे ना! शची कोठे आहे? तिला माझ्यासमोर घेऊन या.''

हे समजल्यावर महाराणी शचीने देवगुरु बृहस्पतींना विनंती केली, ''आचार्यवर, नहुषापासून माझे रक्षण करा.'' यावर बृहस्पतींनी विचार केला व तिला सांगितले, ''नहुषाला सांग की ब्राह्मणांच्या पालखीत बसून महिनाभर स्वर्गाचे प्रथम भ्रमण

करावे. म्हणजे आपले वैभव लोक पाहू शकतील. त्यानंतर मग त्याच पालखीत बसून माझ्या महालात मला भेटायला यावे. तेथे मी आपला स्वीकार करेन.''

शचीने असा निरोप पाठवल्यानंतर नहुषाने आपल्या सेवकांना ब्राह्मणांच्या शोधासाठी पाठविले. स्वर्गात देव राहतात. तेथे ब्राह्मण कोठे सापडणार? त्यामुळे पृथ्वीवरच्या व तेही भारतातील ब्राह्मणांना पकडण्यात आले. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत जेथून जेथून ब्राह्मण मिळाले तेथून तेथून ते पकडण्यात आले. त्यात होते-अगस्त्य, पुलह, पुलस्ती, अत्री, अंगीरस, वशिष्ठ आणि विश्वामित्र हे ऋषिवर्य होते. या सप्तर्षींनी नहुषाची पालखी घेऊन महिनाभर स्वर्गाचे परिभ्रमण केले. ज्या दिवशी महिना पूर्ण झाला त्या दिवशी पालखीचे तोंड शचीच्या महालाकडे वळवले. नहुष फार अधीर झाला होता. त्याला असे वाटले की सप्तर्षी फार हळूहळू चालले आहेत व म्हणून त्याने 'सर्प सर्प' (शीघ्र-शीघ्र) असे ओरडत अगस्तीला लाथ मारली. त्याबरोबर संतापलेल्या ऋषींनी त्याला - ''जा, तू सर्प हो'' असा शाप दिला. त्याबरोबर गंटागळया खात नहुष स्वर्गातून पृथ्वीवर खाली येऊ लागला. तेव्हा घाबरलेल्या नहुषांनी ऋषीची क्षमा मागितली व शापातून मुक्ती कशी मिळेल ते सांगायला सांगितले. तेव्हा ते म्हणाले - ''जेव्हा तुला कोणी ब्राह्मणाचा महिमा सांगेल त्या दिवशी तू या अजगरस्वरुपातून मुक्त होऊन तुला पुन्हा मानवी स्वरुप प्राप्त होईल.''

नहुषाने जिज्ञासेने विचारले, 'भगवन्, पण मला ब्राह्मणाचा महिमा कोण सांगेल? ऋषी श्रेष्ठ म्हणाले, ''सध्या तरी ब्राह्मणाचा महिमा जाणणारा कोणी नाही. मात्र द्वापार युगात आपल्या वनवासकाळात युधिष्ठिर तुला ब्राह्मणाचा महिमा सांगेल तेव्हा तू या अधम योनीतून मुक्त होऊन पुन्हा इंद्रपद प्राप्त करु शकशील.'' संत खरोखर दयाळू असतात. नहुषाने एक महिनाभर आपली पालखी त्यांना फिरवायला लावली; पण तरीही ते रागवले नाहीत. त्याच्या उद्धट आचरणामुळे रागवून त्यांनी शाप दिला परंतु पुन्हा मुक्तीसाठी अभिशापही दिला. याप्रकारे शचीच्या रक्षणाच्या बाबतीत बृहस्पतीने स्वतः हस्तक्षेप न करता स्वतःच्या बुद्धिकौशल्याने नहुषाला शिक्षा दिली.

अशाच प्रकारचे दुसरे एक आख्यान आहे. महान पराक्रमी हिरण्याक्ष तपश्चर्या करु लागला. त्याची कठोर तपश्चार्या पाहून देवतांनी आचार्य बृहस्पतींकडे

निवेदन केले, ''आचार्य, जर या दुष्ट दानवाची तपश्चर्या सफल झाली तर देवतांचे निकंदन होईल, देवता नष्ट होतील. तेव्हा त्याच्या तपश्चर्येत विघ्न निर्माण करा.'' येथेही बृहस्पतींनी स्वतःकाही कृती करणे योग्य समजले नाही. त्यांनी आपला पाळीव पोपट हिरण्याक्षाकडे पाठवला. हिरण्याक्ष जेव्हा 'ब्रह्मणे नमः' असे म्हणे तेव्हा तो पोपट त्याची नक्कल करीत 'विष्णवे नमः' असे म्हणायचा. पहिले एक-दोन दिवस पोपटाच्या याप्रमाणे नक्कल करण्याचा काहीच परिणाम झाला नाही; परंतु एक दोन वेळा 'ब्रह्मणे' ऐवजी 'विष्णवे' असे त्याच्या तोंडून निघू लागले. हिरण्याक्षाच्या हे जेव्हा लक्षात आहे तेव्हा त्याने सोटा उचलला व 'विष्णूच्या लाडक्या पोपटा' असे म्हणाला. पोपट तर उडून गेला; पण हिरण्याक्षाची तपश्चर्या भंग पावली. वास्तविक हिरण्याक्षाने बृहस्पतीचा काय गुन्हा केला होता? पण आपल्या कुटील नीतीने कोणाचाही काटा बिनबोभाट काढण्यात ते कुशल होते-असे अत्यंत चाणाक्ष व प्रतिभावंत बृहस्पती देवांचे गुरु होते. अर्थात, शुक्राचार्यही काही कमी नव्हते. त्यांनी आपल्या शिष्यांची तपश्चर्या पूर्ण करुनच दाखवली.

### आचार्य शुक्राचार्य

आता शुक्राचार्यांची कृत्ये पाहा. त्यांनी आपल्या असुर शिष्यांसाठी संजीवनी विद्या प्राप्त करुन घेतली. या विद्येमुळे जेवढे राक्षस मरत असत तेवढे जिवंत केले जात असत. या शुक्राचार्यांचे दोन मुलगे प्रल्हादाशी झालेल्या संघर्षात मरण पावले होते; परंतु त्यांना देवयानी नावाची एकुलती एक मुलगी होती. एक दिवस राजकन्या शर्मिष्ठा वनभ्रमणासाठी निघाली. तिच्याबरोबर दासी व आचार्य कन्या देवयानीही होती. जलक्रीडेनंतर तिने नजरचुकीने राजकुमारीचे कपडे घातले. यावर राजकुमारी शमिष्ठा तिला अद्वातद्वा खूप बोलली. ती म्हणाली, ''तू तर माझ्या पित्याची स्तुती करणाऱ्या, त्याच्याकडे सतत भीक मागणाऱ्या आणि त्याच्याकडून दान घेणाऱ्या भिक्षुकाची मुलगी आहेस. माझे कपडे घालण्याची हिंमत तू केलीस कशी?'' यावर देवयानी इतरांना म्हणाली, ''हिचे वडील रोज माझ्या वडिलांच्या पाया पडतात, मी आचार्य कन्या आहे. माझ्यासमोर राजकन्येची शेखी नको. आता पोरखेळ सुरु झाला. शर्मिष्ठेने दासींना आज्ञा केली, की हिला विहिरीत फेकून द्या. जंगलात जवळच एक विहीर होती. शर्मिष्ठेच्या दासींनी देवयानीला त्या विहिरीत फेकून दिले. कित्येक दिवस देवयानी त्या विहिरीत

पडून होती. तिला आता आपण येथेच मरणार असे वाटू लागले. अचानक राजा ययाती शिकारीस जाताना त्या बाजूला निघाला असताना विहिरीतून मदतीसाठी कोणाचा तरी आवाज आला. राजाने लगेच एक दोर सोडला. दोराला पकडून देवयानी वर आली. राजाने तिचा हात पकडून तिला आपल्याकडे बाहेर खेचली. जमिनीवर पाय टेकल्यावर तिने स्वतःला सावरले व थोडी शांत झाल्यावर म्हणाली, ''आता मी या जंगलात कोठे जाऊ? आपण मला वाचवलेत त्यामुळे आता या शरीरावर आपलाच अधिकार आहे. तुम्ही माझा हात पकडलात. तेव्हा माझा स्वीकार करुन मला आपल्या बरोबर घेऊन जा.''

ययाती म्हणाला, ''आता थोडया वेळापूर्वी तर तू मला वाचवा! मला वाचवा! असे ओरडत होतीस. आणि आता बाहेर आल्याबरोबर लग्नाची भाषा बोलू लागलीस? कोण आहेस तू?'' देवयानी म्हणाली, ''मी दैत्यगुरु शुक्राचार्यांची मुलगी आहे'' शुक्राचार्यांचा महापराक्रम राजाला माहीत होता. उगाच नाही म्हटले व त्यामुळे ते नाराज झाले तर? म्हणून राजा म्हणाला, ''हे पाहा, विवाहासाठी आई-वडिलांची अनुमती लागते. तेव्हा प्रथम तू आपल्या पित्याची अनुमती घे. त्यानंतर जे उचित असेल ते आपण करु.''

देवयानी शुक्राचार्यांकडे गेली. रडतरडत तिने घडलेला वृतांत सांगितला व म्हणाली मी शर्मिष्ठेचा बदला घेईन. तुम्ही या राजाशी माझा विवाह करुन द्या व शर्मिष्ठेला दासी बनवून माझ्या बरोबर पाठवा. ती म्हणत होती की ''तू भिकाऱ्याची मुलगी आहेस. बाबा तुम्ही भिकारी आहात की गुरु? की आचार्य?'' यावर शुक्राचार्य म्हणाले, ''मी भिक्षू आहे व आचार्यही आहे. दोन्ही गोष्टी बरोबरच आहेत. शर्मिष्ठा अजून अज्ञानी आहे. तिला दासी बनवण्याचा हट्ट तू सोडून दे.'' परंतु देवयानी रडू लागली. तेव्हा मात्र शुक्राचार्य क्षुब्ध झाले व मुलीच्या मोहात फसले.

त्यांनी राजाला सांगितले, ''हे राजन्, मी तुझ्या आचार्यपदाचा त्याग करुन तपश्चर्येसाठी हिमालयात चाललो आहे. माझ्या प्राणप्रिय मुलीवर प्राणघातक हल्ला केला गेला आहे. तिच्याशिवाय मी येथे राहू शकणार नाही. ज्या शर्मिष्ठेने हे कृत्य केले आहे तिला देवयानीची दासी बनवशील तरच मी तुझ्या राज्यात राहू शकतो.'' महाराज वृषपर्वाने विचार केला, युद्धामध्ये जेव्हा असुर मारले जातात

तेव्हा आचर्य शुक्राचार्य त्यांना जिवंत करु शकतात. जर आचार्यच निघून गेले तर आमचे बळ कमी पडेल आणि देवांच्या बरोबर युद्ध तर अटळ आहे. आमचे बळ कमी झाले तर माझ्यासह सर्व असुरांवर ते आधिपत्य गाजवतील. हा होणारा विनाश जर कुटुंबातल्या एका सदस्याच्या त्यागामुळे टळत असेल, तर त्या सदस्याचा त्याग करणेच श्रेयस्कर आहे. एका गावाचा नाश होण्यापेक्षा एका कुटुंबाचा त्याग करणे श्रेयस्कर असते, तर देशाच्या रक्षणासाठी संपूर्ण गावाचा त्याग करणे उचित ठरते. हीच तर खरी नीती आहे. राजाने हीच नीती अवलंबिली आणि आपले मन अत्यंत कठोर करुन आपल्या प्राणप्रिय एकुलत्या एक कन्येला- शमिष्ठेला देवयानीची दासी बनवून पाठवून दिले. एका श्रेष्ठ सम्राटाला शुक्राचार्यांनी अगतिक केले. अशा प्रकारे आचार्य अपत्य मोहासाठी, उपजीविकेसाठी व स्वतःच्या यशप्रतिष्ठेसाठी काहीही करु शकतात.

इकडे देवयानी शर्मिष्ठेमुळे चिंतीत झाली. ती राजकन्या आहे, सौंदर्यवती आहे, गुणवती आहे. अशी युवती राजाच्या नजरेस पडली तर राजा नक्की तिच्यावर आसक्त होईल. तेव्हा असे काही करते की राजाची नजर तिच्यावर कधी पडणार नाही. असे ठरवूनच ती शर्मिष्ठेला म्हणाली, ''हे बघ दासी, जंगलामध्ये असणाऱ्या आमच्या महालात तू राहायला जा व तेथे झाडलोट करुन महाल स्वच्छ ठेवण्याचे काम कर.'' पण देवयानीचा डाव फसला. कारण एक दिवस राजा ययाती शिकारीसाठी जात असताना त्या महालाच्या वरच्या गच्चीत अत्यंत स्वरुपसंपन्न अशी एक स्त्री उभी असलेली त्याला दिसली. तेव्हा राजा तिच्याकडे गेला आणि म्हणाला, ''आपण कोणी देवकन्या आहात, अप्सरा आहात की गंधर्वकन्या आहात?'' यावर शर्मिष्ठा म्हणाली ''राजन मी महाराज वृषपर्वा यांची मुलगी शर्मिष्ठा आहे. आपल्या महाराणीने दासी बनवून मला येथे आणले आहे. या महालाच्या सफाईचे काम मला देण्यात आले आहे.'' ''काय! आपण आणि दासी! माझ्याकडून अजाणता अपराध घडला आहे. मी यापूर्वी तपास का बरं नाही केला?'' राजाने लगेच शर्मिष्ठेच्या बोटात हिऱ्याची अंगठी घालून तिच्याशी गांधर्व विवाह केला. तिला महाराणीचा मान दिला. ययातीपासून तिला तीन पुत्र झाले. देवयानीलाही दोन मुलगे झाले.

एक दिवस महाराणीच्या थाटात आपल्या मुलांबरोबर आनंदात असणाऱ्या शर्मिष्ठेला देवयानीने पाहिले व ईर्ष्येने पेटून निघाली. ती तडक शुक्राचार्यांजवळ गेली आणि राजाविरुद्ध त्यांच्याकडे तक्रार करीत म्हणाली की, ''या राजाने माझा घोर अपमान केला आहे. जिला मी दासी बनवून माझ्या पायदळी तुडपण्याचे ठरवले होते. तिच्या डोक्यावर याने महाराणीचा मुकुट ठेवून तिला महाराणीचा मान दिला आहे. त्याला आपण चांगली शिक्षा करा.'' इतक्यात ययाती तेथे आला. मुलीच्या प्रेमाने अविचारी बनलेल्या शुक्रचार्यांनी त्याला शाप दिला. ''हे राजा, तुला तुझ्या तारुण्याचा फार गर्व झाला आहे ना! तू जरठ वृद्ध बनशील.''

त्यानंतर ययाती इतका जरठ वृद्ध बनला की तो उठण्याचा प्रयत्न करु लागला; पण उठू शकला नाही. कसा तरी सरकत एक लाकडी दांडा पकडून उभा राहिला व हसत म्हणाला, ''आचार्य, आपण तर अप्रत्यक्षपणे आपल्या मुलीला शाप दिला आहे. आता येथे पंखा खात तिला बसू दे. वैधव्याची यातना आता तिला प्रतीत होईल.'' आता देवयानी बेचैन झाली. ती म्हणाली, ''बाबा, तुम्ही हा कसला भयंकर शाप दिलात! अहो, एखादी साधी शिक्षा करायची होती. त्यांना पूर्ववत करा'' शुक्राचार्य म्हणाले, ''आता मी याला पूर्ववत करु शकणार नाही. मात्र एक उपाय आहे. जर याच्या एखाद्या मुलाने आपले तारुण्य याला देऊन याचे वृद्धत्व घेतले तरच हा पूर्ववत होईल.'' देवयानीची मुलं तिथेच होती. कारण ते त्यांचे आजोळ होते. त्यांनी सर्व प्रकार व आजोबांचे बोलणे ऐकले होते. ते लगेच म्हणाले, ''आम्ही यांचे वृद्धत्व घेणार नाही. यांचे डोळे कसे दिसत आहेत! चेहरा सगळा सुरकुत्यांनी भरुन गेलेला आहे. अशा शरीराने आम्ही घोडयावर कसे चढणार? असे वृद्धत्व आपण आपल्या जवळच ठेवावे.''

यदू आणि तुर्वसू या देवयानीच्या पुत्रांनी निराश केल्यानंतर ययातीने शर्मिष्ठेचे पुत्र दुहयू व अनू यांना आपले वृद्धत्व घेऊन तारुण्य देण्याची विनंती केली; पण त्यांनीही वृद्धावस्थेतील दोष वर्णन करुन ययातीचे वृद्धत्व घेण्यास नकार दिला. शेवटी शर्मिष्ठेचा लहान मुलगा पुरु वडिलांना म्हणाला, ''बाबा, आपल्या आदेशाचे पालन मी करायला तयार आहे. हे नश्वर शरीर कधी ना कधी नष्ट होणारच आहे. जर माता-पित्यांच्या सेवेसाठी या शरीराचा उपयोग होणार असेल तर माझ्यासारखा भाग्यवान कोणी असणार नाही,'' त्याने लगेच आपले

तारुण्य पित्याला देण्याचा संकल्प केला व पित्याची जरावस्था स्वतः अंगिकारली व त्यानंतर प्रसन्न मनाने तो ईश्वराच्या ध्यानात मग्न झाला.

काही दिवसानंतर नहुषाच्या पुत्रास-ययातीस वैराग्य आले. विषयांचा कितीही उपभोग घेतला तरी तृप्ती होत नाही हे त्याने पाहिले तेव्हा आपल्या आज्ञाधारी पुत्रावर आपण खूप अन्याय केल्याची त्याला जाणीव झाली. तेव्हा पुरुला त्याचे तारुण्य परत केले व त्याला दिलेले वृद्धत्व परत घेतले. नंतर देवयानी व शर्मिष्ठा या दोघींमधील वैमनस्य संपुष्टात आले व दोघी अत्यंत प्रेमाने राहू लागल्या. या प्रकारे अपत्य प्रेमाच्या अधीन झालेले आचार्य काहीही करु शकतात. ज्या यजमानाने त्यांना मानसन्मान दिला, ज्यांना आचार्यपद दिले ते आचार्य यजमानालाच अगतिक करुन टाकतात. यजमान जितका अधिक मोहवश होतो तितकेच आचार्यही मोहवश होवू शकतात! अंगठा मर्यादेहून मोठा थोडाच असतो?

## आचार्य द्रोण

द्वापार युगातील ही घटना आहे. एक दिवस भरद्वाजाचा मुलगा ऋषी द्रोण यांनी आपल्या मुलाच्या अश्वत्थम्याच्या तोंडाभोवती पांढरे पांढरे लागल्याचे पाहिले. त्यांनी आपली पत्नी कृपी हिला विचारले, ''याच्या तोंडाभोवती हे काय लावून ठेवले आहेस?'' पत्नी म्हणाली, ''तो दुधासाठी हटून बसला होता. म्हणून मी तांदूळ बारीक दळून पाण्यात कालवून त्याला दूध प्यायला दिले व तोंडाभोवती पांढरे तसेच राहू दिले की ज्यायोगे तो त्याच्या मित्रांना सांगू शकेल की मीही दूध प्यायलो आहे.'' हे ऐकून द्रोण स्तब्ध झाले. मर्माघात झाल्याने विव्हल होवून ते म्हणाले, ''जो पिता आपल्या पुत्राला एक पावशेर दूधही देऊ शकत नाही त्या पित्याचा धिक्कार असो. परंतु तू चिंता करु नकोस. मी लगेच दुधाची व्यवस्था करतो. माझा बालमित्र द्रुपद आता पांचाल देशाचा राजा झाला आहे. मी त्याच्याकडून गाय घेऊन येतो.''

सहाध्यायी असल्याने मित्रत्वाच्या नात्याने द्रोण पांचाल नरेश द्रुपदाकडे गेला. त्याठिकाणी मोठेमोठे राजे महाराजे द्रुपदाच्या अभिषेकासाठी आलेले होते. त्याच्यांसमोर द्रोण म्हणाले, ''मित्रा, तुला राजसिंहासनावर विराजमान झालेला

पाहून मला खूप आनंद होत आहे. मित्रा, एक गाय तू मला द्यावीस,'' पांचाल नरेश रागाने म्हणाला ''द्रोणा मित्रत्व व शत्रुत्व हे बरोबरीच्या लोकांबरोबरच होत असते. अरे, कोठे मुर्धाभिषिक्त मी सम्राट आणि कोठे तू भिकारी! भिकारी व सम्राटामध्ये कधी मैत्रीची भाषा ऐकली आहेस का?'' यावर द्रोण म्हणाले, ''आपण दोघे जेव्हा गुरुकुलात-आश्रमात एकत्र शिकत होतो तेव्हा आपण परस्परांना मैत्री निभवण्याचे वचन दिले होते.'' यावर द्रुपद म्हणाला, ''असल्या पोरकट गोष्टी विसरुन जा. द्रोणा, आता तूही मोठा झाला आहेस आणि मीही. तू जर ब्राह्मणभिक्षू बनून गाय मागितली असतीस तर पन्नास गायी तुला दान म्हणून दिल्या असत्या; पण मैत्रीच्या नावावर मात्र मी एकही गाय देऊ शकणार नाही.'' द्रोणाच्या अंगाचा तीळपापड झाला व शेवटी व्यथित होऊन हस्तिनापूरकडे निघाले.

इकडे हस्तिनापुरात कौरव पांडव खेळत होते. खेळता खेळता त्यांचा चेंडू विहिरीत पडला. मुलांना तो काढता येत नव्हता. द्रोण त्यांच्याजवळ गेले आणि त्यांना थोडे सरकांडे आणायला सांगितले. सरकांडे आणल्यावर एकाला एक बांधून ते विहिरीत सोडले व चेंडू बाहेर काढून मुलांना म्हणाले, ''अरे या क्षुल्लक चेंडूचे तुम्ही रक्षण करु शकत नाही; तर या राज्याचे रक्षण कसे करणार?'' तेव्हा मुलांनी द्रोणांना त्यांचा परिचय देण्यास सांगितले. तेव्हा द्रोण म्हणाले की ''आता घडलेला सर्व वृतांत पितामह भीष्मांना सांगा. ते मला चांगले ओळखतात.'' मुलं पितामह भीष्मांकडे गेली. त्यांनी सर्व वृतांत पितामहांना सांगितला. भीष्मांनी द्रोणांना ओळखले. कारण ज्या गुरुकडून द्रोणांनी ही कला प्राप्त केली होती त्याच गुरुचे पितामह भीष्मही शिष्य होते. त्यामुळे सर्व वुत्तांत ऐकताच भीष्म उठले व द्रोणांच्या स्वागताला सामोरे गेले. त्यांचे स्वागत केले व त्यांना गाय भेट म्हणून दिली. त्यांना राहण्यासाठी राजप्रसाद दिला, फिरण्यासाठी रथ दिला. आणि नंतर मुलांच्या उच्चशिक्षणासाठी द्रोणांची आचार्य म्हणून नेमणूक केली. द्रोणाचार्यांच्या उपजीविकेची उत्तम व्यवस्था झाली.

द्रोणाचार्यांनी गरिबीचे दुःख खुप सहन केले होते. त्यामुळे राजकुमारांचे आचार्यपदी नेमणूक झाल्यावर मनापासून त्यांनी मुलांना शिक्षण देणे सुरु केले. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी मुलांची परीक्षा घेतली. परीक्षेत अर्जुनास सर्वश्रेष्ठ म्हणून घोषित केले गेले. समारंभ संपल्यानंतर काही विद्यार्थ्यांबरोबर आचार्य

वनभ्रमणासाठी निघाले. त्यांच्या पुढे एक कुत्रा चालत होता. जवळच निषादराज हिरण्यधनूचा पुत्र एकलव्य धनुर्वेदाचा अभ्यास करीत होता. यापूर्वी आचार्य द्रोणांनी त्याला निषाद-भिल्ल म्हणून कौरवांच्या देखत धनुर्विद्या शिकवण्यासाठी नकार दिला होता. असा हा शामल वर्णाचा एकलव्य पुष्कळ दिवसांपासून स्नान न केलेला व मळके कपडे धारण केलेला असा होता. त्याला बघून कुत्रा त्याच्यावर भंकू लागला. आपल्या अभ्यासात व्यत्यय आणणाऱ्या त्या कुत्र्याला एकलव्याने अशा खुबीने बाण मारले की त्याची जीभ टोकाशी उलटून टाळयाला चिकटली व त्याचे भुंकणे बंद झाले; पण रक्ताचा एक थेंबही बाहेर पडला नाही.

धापा टाकत कुत्रा आपल्या मालकाजवळ गेला. युधिष्ठिर आचार्यांना म्हणाला, ''आचार्य, हे कौशल्य तर आपण अर्जुनाला शिकवलेले नाही. हा धनुर्धर तर अर्जुनापेक्षाही श्रेष्ठ दिसतोय.'' आचार्य म्हणाले, ''चला, कोण आहे ते पाहूया.'' एकलव्याने द्रोणाचार्यांना पाहिले. त्यांना विनम्रपणे वंदन केले. द्रोणाचार्यांनी त्याला विचारले, ''मुला, तू कोण आहेस? आणि हे कौशल्य तू कुठे शिकलास?'' एकलव्याने आपला परिचय देऊन सांगितले की, या कलेचे श्रेय तर आपल्यालाच आहे. आर्श्चयचकित झालेले द्रोणाचार्य त्याला म्हणाले,''अरे, आम्ही तर तुला कधीच कुठले शिक्षण दिलेले नाही.'' एकलव्याने द्रोणाचार्यांच्या पुतळयाकडे बोट दाखवून तो म्हणाला, ''या मूर्तीला रोज वंदन करतो आणि रोज अभ्यास करतो. झाडावर चढून आपण कसे शिकवता ते बारकाईन पाहतो आणि तसा मी सराव करतो.'' हस्तिनापूरच्या विरोधी पक्षात असणाऱ्या निषाद संस्कृतीतील हा धनुर्धर जर अर्जुनापेक्षा श्रेष्ठ ठरला तर माझे श्रेष्ठत्व आणि उपजीविका या दोन्ही गोष्टी धोक्यात येतील. हा विचार करुन द्रोणाचार्य म्हणाले, ''मुला, मग मला तू गुरुदक्षिणा नाही देणार?'' अत्यंत उल्हासाने एकलव्य म्हणाला, ''गुरुदेव, आपण आदेश द्यावा,'' द्रोणाचार्य म्हणाले, ''तू तुझ्या उजव्या हाताचा अंगठा कापून गुरुदक्षिणा म्हणून मला दे.''

आधुनिक शिष्य असता तर म्हणाला असता, ''मला या मूर्तीने शिकवले आहे. मूर्तीने मागितली तर मी गुरुदक्षिणा देईन.'' परंतु तो गुरुभक्त एकलव्य होता. त्याने लगेच आपला अंगठा कापून द्रोणाचार्यांना अर्पण केला. द्रोणाचार्यांनी जरी त्याला दुसऱ्या बोटांनी बाण चालवायला सांगितले तरी पूर्वीची निपुणता

कोठून येणार? आपल्या प्रतिष्ठेला धक्का पोहचणार आहे हे पाहताच द्रोणाचार्यांनी केवढी मोठी चूक केली! अर्जुन तर असाही सर्वश्रेष्ठच राहिला असता. कारण त्याचे शिक्षण केवळ द्रोणाचार्यांपर्यंत सिमीत नव्हते. भगवान शंकराकडून त्याने पाशुपात अस्त्र प्राप्त केले होते. ते द्रोणाचार्य त्याला कधीच देऊ शकले नसते. कारण ना ते द्रोणाचार्यांजवळ होते ना परशुरामाजवळ होते. अर्जुन जेव्हा देवलोकात गेला होता तेव्हा तेथेही देवांकडून अनेक प्रकारच्या शस्त्रास्त्रांचे त्याने शिक्षण घेतले होते. अर्जुनासाठी द्रोणाचार्यांचा फक्त आशीर्वादच पुरेसा होता. तो नेहमी सर्वश्रेष्ठच राहिला असता; परंतु आपल्या उपजीविकेच्या भीतीने त्यानी अशी गुरुदक्षिणा मागितली. ती त्यांची विवशता होती. परिस्थितीजन्य निर्णय होता. तो काही जातिवाद नव्हता. त्या काळात जातिवादाला स्थानच नव्हते. पूर्वी सम्राट होते, बाकीचे प्रजाजन असत. आणि त्या प्रजाजनांचे लाखो व्यवसाय असत.

## आचार्य परशुराम

कर्णदेखील द्रोणाचार्यांकडे धनुर्विद्या शिकण्यासाठी आला होता. तेव्हा द्रोणाचार्यांकडून त्याला उत्तर मिळाले, ''मी फक्त क्षत्रिय राजकुमारांनाच शिकवत असतो.'' तेव्हा कौरव-पांडवांपेक्षा वेगळया दिसणाऱ्या एका तरुणाकडे बोट दाखवून कर्णाने विचारले, ''गुरुवर्य, हा तरूण कोण आहे?'' द्रोण म्हणाले ''तो माझा पुत्र अश्वत्थामा आहे.'' त्यावर कर्ण म्हणाला, ''ओह! म्हणजे हा तर राजकुमारही नाही व क्षत्रियही नाही. प्रणाम!'' असे म्हणून तो निघूनही गेला. द्रोणाचार्यांना काही विचार करण्याचा अवसर देण्यापूर्वीच कर्ण परशुरामाकडे गेला. कर्णाने मनात विचार केला की द्रोणाचार्य क्षत्रिय राजकुमारांनाच शिकवतात; तर परशुराम ब्राह्मण छात्रांनाच शिकवतात. कारण काशीच्या राजाच्या ज्या तीन कन्यांचे अपहरण परशुराम शिष्य भीष्माने केले होते त्यापैकी एका मुलीने अंबाने शाल्व नरेशाला मनोमन वरले होते. भीष्माला ही गोष्ट समजली तेव्हा भीष्माने तिला शाल्व राजाकडे पाठवले, पण त्याने तिचा स्वीकार केला नाही. अम्बाच्या या दुर्दशेचे कारण भीष्मच आहे असे समजून शाल्वाने भीष्माचे गुरु परशुरामांना भीष्माला आज्ञा करण्याची विनंती केली. त्यानुसार परशुरामांनी भीष्मास अम्बेशी विवाह करण्यास सांगितले; पण त्यांनाही भीष्माने नकार दिला. तेव्हा परशुरामाने

भीष्माशी युद्ध केले. पण त्या युद्धात ते पराजित झाले. तेव्हा परशुरामांनी एक प्रतिज्ञा घेतली की आता या पुढे कोणत्याही क्षत्रियाला मी युद्धकला शिकवणार नाही. कारण आपल्या प्रतिज्ञेपुढे गुर्वादेशाचीही ते उपेक्षा करतात.

कर्णाने या अशा आचार्यांकडे धनुर्विद्या शिकण्याचे ठरवले. सहा महिने थांबून त्याने आपली शेंडी वाढवली. पूर्वी आचार्य परंपरेतील लोक गाईच्या खुरासारखी शेंडी ठेवायचे. कर्णाने तशी शेंडी ठेवली, गळयात जानवे घातले, आपली वंशावळ पाठ केली व परशुरामाकडे तो गेला. परशुरामाने विचारले, ''मुला, तू कोण आहेस?'' कर्ण म्हणाला, ''ब्राम्हण!'' कोणता ब्राम्हण?'' तेव्हा कर्णाने शाखा, प्रशाखा, गोत्र, कुळ या सर्व गोष्टी त्यांना सांगितल्या. परशुरामाने आपल्या आश्रमात त्याला प्रवेश दिला. गुरुजी एक फूट शिकवायचे तर तो एक मीटर पुढे शिकायचा. कारण युद्ध कौशल्य त्याच्या रक्तातच होते, तसेच तो एक देवपुत्र होता. एक दिवस परशुरामाने आपल्याजवळील अंतीम अस्त्र जे ब्रम्हास्त्र ते कर्णाला प्रदान केले. तेव्हा कर्ण म्हणाला, ''गुरुदेव, गुरुदक्षिणा काय देऊ ते सांगावे.'' परशुराम म्हणाले, ''कर्णा, तुझ्यासारखा शिष्य भाग्यवान गुरुलाच प्राप्त होत असतो. कित्येक वर्षांपासून मी तुझ्यासारख्या योग्य शिष्याच्या शोधात होतो. भीष्म तसा होता; पण तू तर त्याच्यापेक्षा काकणभर श्रेष्ठच आहेस. मी दिलेल्या विद्येचा सदुपयोग कर हीच माझी खरी गुरुदक्षिणा आहे.''

असे म्हणून गुरुदेव थकल्याने झोपून गेले. कर्णाने आचार्यांचे डोके आपल्या मांडीवर घेतले. तेव्हा अलर्क नावाचा एक भुंगा कर्णाच्या मांडीखाली गेला व कर्णाची मांडी पोखरु लागला. गुरुदेवांची झोपमोड होऊ नये म्हणून कर्ण वेदना सहन करीत बसला. तेवढयात त्या कीटकाने आचार्यांच्या कानावर पंजा मारला तसे आचार्य उठून बसले. त्यांना रक्ताचा ओघळ दिसला. हे रक्त कोठून आले? असे परशुरामाने विचारल्यावर कर्ण म्हणाला, ''एका कीटकाने माझ्या मांडीचा चावा घेतला'' गुरुजी म्हणाले, ''मग तू पाय बाजूला का सरकवला नाहीस.'' कर्ण म्हणाला, ''गुरुदेव, आपली झोपमोड झाली असती. आपल्या सेवेपेक्षा मला माझ्या मांडीचे महत्त्व वाटत नाही. असे तर अनेक कीटक चावत असतात.'' परशुराम म्हणाले ''तू तुझा कोणता वर्ण सांगितला होतास?'' कर्ण म्हणाला, ''ब्राह्मण!'' परशुरामांचे समाधान झाले नाही. ते म्हणाले, ''खंर बोल कोण आहेस

तू? अशा वेदना व कष्ट सहन करण्याची क्षमता ब्राह्मणांमध्ये असत नाही.'' यावर कर्ण म्हणाला, ''आचार्य, मी सूतपुत्र आहे.'' परशुराम म्हणाले, ''सारथ्यांमध्येही अशा प्रकारची सहनशक्ती नसते. तू क्षत्रिय आहेस. तू मला फसवून माझ्याकडून विद्या मिळवलीस. पण लक्षात ठेव की, युद्धात जेव्हा तू शत्रूकडून घेरला जाशील, तेव्हा मी दिलेल्या विद्येचे तुला विस्मरण होईल.'' आणि असेच घडले. अर्जुनाशी युद्ध करताना जेव्हा त्याच्यावर प्राणसंकट आले तेव्हा कर्णाला अवगत असलेल्या विद्येचे विस्मरण झाले. कर्ण युद्धात मारला गेला. द्रोणाने नुसता अंगठा घेतला; परंतु परशुरामाने तर शिष्याचे प्राण घेतले. कोणत्याही आचार्याला अभिमान वाटावा असा कर्णासारखा शिष्य एखाद्या भाग्यवंत गुरुलाच मिळू शकतो. अशा शिष्याला मृत्यूचा आशीर्वाद दिला.

परशुराम क्षत्रियांच्या विरुद्ध होते असेही काही नाही. ते क्षत्रियांचे कधीही वैरी नव्हते. जनक-दशरथ सारख्या क्षत्रियांबरोबर त्यांचा क्षुल्लक वादविवादसुद्धा झाला नाही. शस्त्रधारी लोक स्वभावाने अहंकारी असणे स्वाभाविक आहे. अशा अहंकारी, मदांध लोकांविरुद्ध त्यांनी शस्त्र उचलले होते. रावणाचा पराजय करण्यास समर्थ असणाऱ्या हैह्यवंशीय सहस्त्रार्जुनाचा पराभव केला होता. ते रावणाचाही वध करु शकत होते. परंतु नियतीने जे ठरविले होते तसे होण्यातच त्यांनी कल्याण समजले.

तो प्रसंग असा होता. एकदा रावण मोठे सैन्य घेऊन शिवपूजा करण्यासाठी अमरकंटक येथे गेला. सैनिकांनी पूजेसाठी फुलांचा जणू पहाड रचला. रावणाने मृत्तिकेचे शिवलिंग बनवले आणि नर्मदा किनारी शिवाच्या आराधनेत तल्लीन झाला. तेथून थोडयाच अंतरावर हैह्यवंशीय सम्राट सहस्त्रार्जुन आपल्या राण्यांसह जलक्रीडेसाठी नर्मदातटी आला होता. त्याने आपल्या बाहुबलाने नर्मदेचा प्रवाह गंमत म्हणून रोखून धरला. पाण्याची पातळी वाढू लागली. रावणाच्या पुजेची फुले वाहून जाऊ लागली. सेनापती प्रहस्तने हा काय प्रकार आहे हे जाऊन पाहिले तेव्हा सहस्त्रार्जुनामुळे हे घडले हे लक्षात येताच त्याने सहस्त्रार्जुनावर आक्रमण केले. परंतु सहस्त्रार्जुनाने त्याला इतका प्रखर लढा दिला की प्रहस्त तेथून पळून गेला.

आपल्या सभोवती जलप्रवाह वाढलेला पाहून रावण स्वतः तेथे आला. सहस्त्रार्जुनाने रावणालाही हतबल करुन त्याला कैद केले. रावणाच्या सैन्यालाही बेदम मारपीट करुन पळवून लावले. महर्षी पुलस्त्यला ही गोष्ट समजताच त्याने आपल्या नातवाला सहस्त्रार्जुनाच्या बंधनातून मुक्त केले. कालांतराने सहस्त्रार्जुन व त्याची मुले अत्यंत उत्पाती बनली. त्यांनी महर्षी जमदग्नीच्या गाईच्या वासरास मारुन टाकले. त्याची गायही बळकावली. त्यांना विरोध करताच त्यांनी जमदग्नीची हत्या केली. जमदग्नीची पत्नी रेणुकाने आपला पुत्र परशुराम यास ही गोष्ट सांगितली. तेव्हा संतप्त झालेल्या परशुरामाने सहस्त्रार्जुनाच्या सर्व पुत्रांना मारुन टाकले. रावणाला पराभूत करणाऱ्या सहस्त्रार्जुनाचे दोन्ही हात कापून टाकले. याप्रकारे ते अतुल पराक्रमी होते. परंतु कोणाचा वध कोणत्या वेळी व कोणाकडून होणार आहे हे ते जाणत होते. आणि म्हणूनच रावणाचा वध ज्या धनुष्याने होणार होता ते कोदंड खांद्यावर टाकून योग्य व्यक्तीची प्रतिक्षा करीत फिरत होते. वेळ येताच तेच कोदंड धनुष्य एका क्षत्रियाला देऊन टाकले.

भीष्माकडून पराजित झाल्यानंतरही ते भीष्माची आठवण मोठया प्रेमाने करायचे. म्हणून तर ते कर्णाला म्हणाले, ''भीष्म माझा चांगला शिष्य आहे; परंतु तू तर त्याच्यापेक्षाही एक पाऊल पुढे आहेस.'' जर भीष्माचा त्यांना राग किंवा द्वेष असता तर ते कर्णाला म्हणाले असते, ''कर्णा, जा भीष्माला पराभूत करुन ये. तीच माझी खरी गुरुदक्षिणा आहे.'' पण त्यांनी असे सांगितले नाही. कर्णाला शाप मिळाला कारण ते निश्चितच होते. महाभारतातील कर्णपर्वाच्या सत्ताविसाव्या अध्यायात इंद्राच्या एका शंकेला उत्तर देताना ब्रम्हाने सांगितले होते, ''कर्णश्च दानवः पक्ष अतः कार्यः पराजयः''-कर्ण हा दानवपक्षातील पुरुष आहे. तेव्हा त्याचा पराजय करायलाच पाहिजे. परशुरामांना हे रहस्य माहीत होते. धर्मपरायण व्यक्ती भविष्यकाळात घडणाऱ्या गोष्टी जाणत असतात. अर्थात, परशुरामांनी शाप दिल्यामुळे कर्णाची गुरुवरील निष्ठा कधीही कमी झाली नाही. युद्धामध्येही मी परशुरामांचा शिष्य! असे उद्‌गार त्याच्या तोंडून सतत निघत होते.

कर्णाने एकदा आचार्य द्रोणांना जिज्ञासेने विचारले, ''आचार्य, आपण एकलव्याचा अंगठा का मागितला?'' आचार्य द्रोण म्हणाले, ''एकलव्याचा पिता जरासंधाचा सेनापती होता; त्यामुळे एकलव्याच्या धनुष्याचा रोख हस्तिनापूरकडे

असल्याचे मला स्पष्ट दिसत होते, म्हणून त्याचा अंगठा मला मागावा लागला.'' आचार्य (शिक्षक) फार पुढचा विचार करत होते; पण शाश्वत धर्माविषयी विचार करण्याची क्षमता या आचार्यांत कधीही नव्हती. अशा प्रकारची क्षमता फक्त सद्गुरुंमध्येचे असते. तेच सद्धर्माचे उद्गाते असतात.

**स्मृती**

या आचार्यगुरुंच्या नावाने प्रचलित असणारे स्मृती ग्रंथ धर्मशास्त्राच्या रुपाने समाजात प्रचलित आहेत. या ग्रंथात या आचार्यांचा चित्तभ्रम, पुत्र-मोह, उपजीविकेचा मोह, व्यक्तिगत मान, प्रतिष्ठा या सर्व गोष्टी अगदी ठासून भरल्या आहेत. एवढेच नव्हे तर या आचार्यांसाठी सर्वत्र आरक्षण! मंत्र्याच्या जागेसाठी, न्यायपदासाठी, सर्व प्रकारच्या सुखसोयींसाठी सर्वत्र स्वतःसाठी त्यांनी अमुक पदे खास राखून ठेवली आहेत. ज्या प्रकारे आंधळा धृतराष्ट्र पुत्रमोहामुळे विकल झाला होता (पांडव कसे मारतील? माझा लाडका दुर्योधन कसा सम्राट बनेल? तो सम्राट बनला तर त्याला सर्वात जास्त हिस्सा मिळेल) तशाच प्रकारे हे आचार्य आपल्या पदांसाठी विकल होते.

एक दिवस आचार्य द्रोणांनी रणांगणावर ऐकले ''अश्वत्थामा हतो'' एवढेच ऐकल्यावर ते घाबरेघुबरे झाले, मुठीतला जोर संपला, हातातून धनुष्य गळून पडले आणि ते किंकर्तव्यमूढ होऊन खाली बसले. एवढयात त्यांची मान कापली गेली. पुत्रमोहाने जेवढा धृतराष्ट्र विकल झालेला दिसून येतो, तेवढेच आचार्य द्रोणही विकल झालेले दिसून येतात. परंतु सद्गुरुंना मात्र ना पुत्र-मोह असतो ना स्वतःच्या जीवाचा मोह असतो. त्यांना ना उपजीविकेबद्दल चिंता असते ना उच्च पदाची किंवा प्रतिष्ठेची अभिलाषा असते. सृष्टीमध्ये अशी कोणतीही गोष्ट नाही जी सत्पुरुषाचा सन्मान करु शकेल. पूज्य महाराजश्री म्हणत असत ''सगळया जगाने तुम्हाला साधू म्हटले तरी ते खरे नव्हे. जेव्हा आत्मा तुम्हाला साधू म्हणेल तेव्हाच तुम्ही खरे साधू असता. अशा वेळी जग तुम्हाला साधू म्हणो की न म्हणो. जगाची पर्वा करायची काय जरुर? जर ईश्वर तुम्हाला संत म्हणेल तरच तुम्ही संत आहात, अन्यथा कदापि नाही.'' सृष्टीमध्ये असे कोणतेही प्रमाणपत्र नाही, जे सद्गुरुचा सन्मान करु शकेल.

ज्या रीती-रिवाजांचे संकलन स्मृतींमध्ये केले आहे, त्या रीती-रिवाजांपासून महापुरुष नेहमी मुक्त असतात. भगवान गौतम बुद्धांच्या नंतर म्हणजे येशूच्या दोनशे तीनशे वर्षांपूर्वी या स्मृतीग्रंथाचे लिखाण सुरु झाले व तदनंतर दोनशे तीनशे वर्षांपर्यंत स्मृतीग्रंथाचे लिखाण सुरु होते. मनुस्मृती, पराशरस्मृती, याज्ञवल्क्यस्मृती यांपैकी कोणतीही स्मृती ज्यांच्यानावे स्मृतीग्रंथ आहे त्यापैकी कोणत्याही महापुरुषाने लिहिलेला नाही. कारण ''**स्वायंभुव मनु अरु शतरुपा। जिनते भई नर सृष्टी अनूपा।।**''

स्वायंभुव म्हणजे स्वयं कर्ता-करविता महाराज आणि जिच्यापासून अनुपम सृष्टीची रचना झाली ती माता सत्या स्वरुपा. जे अति श्रेष्ठ आहेत तेथे कोणी अस्पृश्य कसा झाला? कोणी पिता आपल्या चार पुत्रांपैकी एकाला पवित्र व दुसऱ्याला निकृष्ट म्हणेल का? आणि मनूच्या नंतर चौदा मन्वंतरे हा क्रम चालत राहिला. जेव्हा आणखी समृद्धी वाढली तेव्हा प्रजापती युग आले. प्रजापती मरीची, प्रजापती कश्यप, प्रजापती दक्ष इत्यादी इतिहास प्रसिद्ध आहेत. प्रजापती कश्यपाला अनेक राण्या होत्या. त्यापैकी दोन राण्या व त्यांच्या मुलांत सतत ईर्ष्या व स्पर्धा चालत असे. तेव्हा प्रजापती कश्यपाने भूभागाचे दोन भाग करुन त्या पुत्रात वाटून दिले. दितीची मुले दानव व अदितीची मुले देवता अलग अलग ठिकाणी राहू लागले. तरीही स्वतःचे वर्चस्व गाजवण्यासाठी ते परस्परांत भांडतच राहिले. त्यात देवगुरु बृहस्पती आणि दानवगुरु शुक्राचार्य दंड ठोकून दोंघाना चेतावत राहिले. आचार्यांनी परस्परांना लढत ठेवले म्हणजे आचार्यांनी परस्परांत लावून दिलेली ही आग आहे. अन्यथा आरंभी देव व दानवांमध्ये चांगल्या प्रकारचे संबंध होते. दानवराज पुलोमाची मुलगी शचीचे देवराज इंद्राशी लग्न झाले होते. देवगुरु बृहस्पतीची मुलगी जयंती शुक्राचार्यांची अर्धांगीनी होती. उच्च-नीचतेची भावना समाजात या आचार्यांनीच आणली आहे. मनुस्मृतीमध्ये चौथ्या अध्यायात शिंपी, कोळी, सोनार, धोबी, चांभार, न्हावी, कुंभार इ. जातींचा उल्लेख आहे. परंतु त्या काळात अशा प्रकारचे विभाजन किंवा जाती नव्हत्या. त्या काळातील शब्दकोषात हे शब्दच नव्हते. महाभारत काळापर्यंत म्हैस ही जंगली प्राणी म्हणून ओळखली जायची. कारण भीमाने जंगली प्राणी मारले होते त्यात म्हशीचा उल्लेख आहे. परंतु मनुस्मृतीच्या पाचव्या अध्यायात असे म्हटले आहे की जंगली

प्राण्यांमध्ये म्हशीचे दूध पिता येते. यावरुन दुभत्या प्राण्यांच्या स्वरुपात म्हशींची धरपकड सुरु झाली होती असे दिसते. सारांश, ही स्मृती मानवाचा आदि पूर्वज मनूची रचना म्हणून कशी स्वीकारता येईल?

प्राचीन श्रेष्ठ पुरुषांच्या नावावर ज्या स्मृती प्रचलित आहेत त्यात आचार्यांचा भ्रम भरुन राहिला आहे. उपजीविकेचे आरक्षण, अपत्यप्रेम, आपल्या श्रेष्ठतेचे संरक्षण इत्यादी गोष्टी त्यात भरपूर आहेत. परंतु भारत स्वंतत्र होताच वंशपरंपरेने होणारे आरक्षण समाप्त झाले. म्हणजे शिक्षकाचा मुलगा शिक्षक, वैद्याचा मुलगा वैद्य ही परंपरा समाप्त झाली व स्मृतीनुसार जे झोपडीत राहण्याच्या पात्रतेचे आहेत त्यांना घटनेनुसार आता संरक्षण मिळाले आहे. ते शिक्षण घेऊन व्हाइस-चान्सलरच्याही वर चान्सलर होऊ लागले आहेत. स्मृतींची परंपरा आता समाप्त होऊ लागली आहे. कारण स्मृती म्हणजे धर्म नव्हे. सामाजिक व्यवस्थेचे ते एक सूत्र होते, एक आचार संहिता होती. धर्मशास्त्र नव्हे.

आम्ही असे ऐकले आहे की विद्यार्थी तर शाळेत वेळेवर जातात; पण तेथे त्यांना शिकवलेच जात नाही. काही शिक्षक बाहेर चहाच्या, पानपट्टीच्या दुकानावर चकरा मारत असतात. ते विद्यार्थांना म्हणे सांगतात, ''आमची शिकवणी लावा म्हणजे झाले,'' असे जर चालू असेल तर हे फार भयंकर आहे. अहो शिष्याचा अंगठा घेणे क्षम्य आहे; पण ज्या बालकांना तुमच्या हातात सोपवले जात आहे त्यांचे जीवन अशाने खराब करत आहात. म्हणजे आचार्यांची परंपरा आजही पूर्वीप्रमाणेच सुरु आहे. त्यात काही फरक नाही. ते विद्यार्थ्यांकडून काहीही घेऊ शकतात. हा जातिवाद नाही, आजदेखील आचार्यांच्या या कृत्याला जातिवादाची संज्ञा कधीही दिली जात नाही.

**सद्‌गुरु (धर्मगुरु)**

महापुरुषांच्या दृष्टीत कोणी श्रेष्ठ-कनिष्ठ, स्पृश्य-अस्पृश्य असा भेद असत नाही. सृष्टीतील कोणताही श्रेष्ठ मनुष्य त्यांना आकर्षित करु शकत नाही. ते सतत भटकत असणाऱ्या आत्म्याला सन्मार्गावर आणण्याच्या प्रयत्नात असतात. त्यांना जातिपातीचे बंधन असत नाही. तुम्ही कोणत्या धंद्यात प्रवीण आहात किंवा कशात तुमची गती नाही किंवा कशात तुमची गती कमी आहे या

कोणत्याही गोष्टीत त्यांना रस नसतो. त्यांचे लक्ष फक्त व्यक्तीच्या मनःस्थितीवर असते.

भगवान बुद्ध एक दिवस भिक्षाटणासाठी चालले होते. रस्त्यात एक भंगी मैल्याचे टोपले डोक्यावर घेऊन चालला होता. मैला त्याच्या खांद्यावर टपकत होता. त्याने बुद्धांना पाहिले आणि झाडीकडे वळला. बुद्ध त्याच्या मागे मागे जाऊ लागले. बुद्धांना येत असल्याचे पाहून तो भंगी भरभर चालू लागला. तरीही बुद्धदेव मागे येत आहेत हे पाहून तो जोराने पळू लागला. तरीही बुद्धदेवांनी त्याची पाठ सोडली नाही. शेवटी नदीच्या किनारी असणाऱ्या झाडीत त्याने ते मैल्याचे टोपले फेकून दिले व नदीत उडी मारली. बुद्धदेवांनीही नदीत उडी मारली. त्या मनुष्याला पोहता येत नव्हते; त्यामुळे एके ठिकाणी तो नदीत उभा राहिला. अणि हात जोडून म्हणाला, ''भगवन् मला स्पर्श करु नका. मी अस्पृश्य आहे, मी क्षुद्र आहे, मी अभागी आहे. मला स्पर्श केल्याने आपण अपवित्र व्हाल.'' भगवान बुद्ध म्हणाले, ''वत्सा, मी अपवित्र नाही होणार; पण तुला तर काही हरकत नाही ना!'' निरुपाय झाल्यावर तो म्हणाला, ''भगवन्, मला कसली हरकत असणार?''

तथागतांनी आपल्या शिष्याला सांगितले, याला पकडा, आंघोळ घाला आणि भिक्षू बनवा. आनंद वगैरे श्रेष्ठ शिष्य बरोबरच होते. त्यांनी गुरुदेवांच्या आज्ञेचे पालन केले. त्याला स्नान घातले, नवीन वस्त्र नेसायला दिले व हातात भिक्षापात्र दिले. त्या महापुरुष बुद्धांनी त्याला सांगितले, ''आजपासून तू बौद्ध भिक्षू आहेस. सत्यशोधक आहेस.''

ही बातमी अनेक राज्यात विजेसारखी पसरली. गौतम बुद्धांनी एका भंग्याला आपला शिष्य बनवला या बातमीने सर्वत्र हाहाःकार माजवला. कोशलराज प्रसेनजितकडे लोकांनी तक्रार केली की, ''महाराज, हा तर अनर्थ झाला. एका अस्पृश्याला धर्माचा उपदेश दिला.'' राजा म्हणाला, ''मी स्वतः याचा तपास करेन.'' दिवस नक्की झाला. तीन महिन्यांनी येणाऱ्या पौर्णिमेच्या दिवशी राजाने स्वतः तपास करायचे ठरवले. इकडे भगवान बुद्धांनी आपल्या शिष्यांची सभा बोलावली. सभेपुढे प्रश्न ठेवण्यात आला की या समस्येचे निराकरण कसे करावे? तेव्हा बुद्धांचा वरिष्ठ शिष्य सारिपुत्राने सांगितले, ''भगवान, आम्हांला उत्तर देण्याची काय आवश्यकता आहे?'' याचे उत्तर तर स्वंय हाच देईल. बुद्धांनी

विचारले "हे कसे शक्य आहे?" सारिपुत्र म्हणाला, "याला एवढे शिक्षण द्यावे की ज्या योगे राजाच्या प्रश्नाचे उत्तर तो स्वतःच देऊ शकेल." तेव्हा बुद्धदेव म्हणाले, "सारिपुत्रा, ही जबाबदारी मी तुझ्यावर सोपवत आहे." सारिपुत्राने त्याप्रमाणे त्याला शिक्षण देण्यास सुरुवात केली.

तीन महिन्यानंतर राजा तपास करण्यासाठी आश्रमात आला. आश्रमाच्या मुख्य दरवाजापुढे वडाच्या झाडाखाली एका चबुतऱ्यावर एक भिक्षुक बसला होता. तो शांतपणाने प्रवचन करीत होता आणि शंभर एक लोक व इतर भिक्षुक शांतपणाने ते प्रवचन ऐकत होते. तो अत्यंत संयत वाणीने तथ्यपूर्ण प्रवचन करीत होता. प्रसेनजित राजा तेथे थोडा थांबला, पाच मिनिटे भिक्षुकांचे प्रवचन ऐकले व विचार केला की, प्रथम गौतम बुद्धांना प्रणाम करुन नंतर पुनः थोडी कथा श्रवण करु. कारण कथा अत्यंत उपयुक्त व सुंदर आहे. राजाने बुद्धदेवांना नमस्कार केला व विचारले, "भगवन् हा नवा भिक्षू कोण आहे? याला आम्ही पूर्वी कधी पाहिलेले नाही? याचा चेहरा सौम्य आहे पण याची वाणी ओजस्वी आहे आणि प्रवचनही अर्थपूर्ण आहे." भगवन् बुद्ध म्हणाले, "राजन् ज्याचा तपास करायला आपण आला आहात तोच हा भिक्षू आहे. प्रसेनजित म्हणाला, भगवान् एक भंगी या स्तरापर्यंत पोहोचू शकतो? आश्चर्य आहे! तेव्हा गौतम बुद्धांनी सांगितले, "राजन्, समाजात उपजीविकेची अनेक साधने असतात. वास्तविक तो ना भंगी होता ना अस्पृश्य ना अधम! तो फक्त एक मानव होता जो त्या परिस्थितीत स्वतःची उपजीविका करत होता. सत्पुरुषांचे सान्निध्य मिळताच त्याच्यात परिवर्तन आले. आता सारिपुत्र ज्या स्तरावर आहे त्याच स्तरावर तो आहे." नंतर बुद्धांच्या उत्तम शिष्यांत त्याची गणना होऊ लागली. गरीब मनुष्य प्राणपणाने काम करीत असतो. शुद्रांना किंवा क्षत्रियांना शिकवायचे नाही असे महापुरुषांना वाटत नसते. ज्याचा जसा स्तर असतो त्याप्रमाणे त्याला ते मार्गदर्शन करीत असतात. महात्मे समदर्शी तर असतातच परंतु ज्याची जशी पात्रता असते त्या स्तरावरुन त्याचा उत्कर्ष ते करतात. म्हणून ते समवर्ती असतात- **अमित रुप प्रकटे तेहीं काला। जथा जोग मिले सबही कृपाला।।**

बोधप्राप्तीनंतरही गौतम बुद्ध जेव्हा घरी परतले नाहीत तेव्हा त्यांच्या वडिलांनी शुद्धोधनाने मंत्र्याकरवी त्यांना संदेश पाठवला- जगातील सर्व प्राणी

आपणाला आपले वाटतात मग आम्हीच फक्त परके झालो आहोत का? एकदा आमच्या दारात भिक्षेसाठी यावे. बुद्धाने राजाचे आमंत्रण स्वीकारले आणि निरोप पाठवला, ''राजन, एक दिवस आम्ही भिक्षेसाठी आवश्य येऊ.'' काही महिन्यानंतर बुद्धदेव म्हणाले, ''भिक्षूंनो, राजाकडे आज भिक्षेला जाऊ. खूप दिवासांपासून ते आमंत्रण बाकी राहून गेले आहे.'' राजाकडे तशी सूचना पाठवली गेली. राजसेवक राजाला सूचना देत राहिले, ''आता कुमार येथे आले आहेत,... या बागेपर्यंत आले आहेत, या गावापर्यंत आले आहेत.'' संपूर्ण महाल निपुण कारागिरांकडून सजवला गेला.

कुमारी मुली मंगलकलश घेऊन महालाबाहेर उभ्या राहिल्या. रंग-बेरंगी ध्वजा- पताकांनी संपूर्ण नगर सुशोभित केले गेले. मुख्य अधिकाऱ्यांसह राजा स्वतः मुख्य दरवाजावर स्वागतासाठी उभा राहिला.

परंतु मुख्य दरवाजाजवळ जाण्यापूर्वीच बुद्धदेव म्हणाले, ''अरे, भिक्षूनो भिक्षेची वेळ तर झाली आहे.'' बुद्धदेव म्हणाले, ''तर मग भिक्षेला जावे. कारण महाराजांच्याकडचे आज आपल्याला आमंत्रण नाही. कधी तरी येईल.'' संकेत लक्षात येताच तेथील सर्व गल्ल्यांमध्ये ते गेले. बुद्धदेवही एका झोपडीसमोर जाऊन उभे राहिले व म्हणाले, ''भिक्षां दे हि।'' ते एका चांभाराचे घर होते. घरातील वृद्ध स्त्री बाहेर आली व म्हणाली, ''राजकुमार, माझे अहोभाग्य! आपण लहान असताना आपल्या शय्येच्या अवतीभोवती मी आपली सेवा करीत असे. हे माझे घर आहे. प्रभू, मी चांभार आहे. आपण येथे यायला नको होते.'' बुद्ध म्हणाले, ''मी आपल्याला आपली जात विचारली नव्हती. मी आपल्याकडे फक्त भिक्षा मागितली होती. माते तू एका भिक्षूला भिक्षा देणार नाही का?''

वृद्धेच्या डोळयात पाणी आले. उभ्या आयुष्यात तिच्याशी असे प्रेमाने कोणी बोलले नव्हते. त्या वृद्धेजवळ फक्त भाजलेले बटाटे होते. ते तिने एका खापरावर ठेवले व बुद्धदेवांना दिले. बटाटे खात बुद्धदेव पुढे निघाले. राजा शुद्धोधन भान विसरुन रागाने लाल होत म्हणाला, ''हे सर्व काय सुरु आहे?'' बुद्धदेव हसत म्हणाले, ''महामहिम, हे तर आपल्या वंशपरंपरेचे मी पालन करीत आहे.'' राजा म्हणाला, ''वंश म्हणजे काय? तू कशाला वंश म्हणतोस? तुझा वंश तर मी आहे.'' बुद्धदेव म्हणाले, ''महामहिम, आपण विसरत आहात की आपला

वंश परमहंसांचा आहे, सत्पुरुषांचा आहे, अरिहंत-कैवल्यपद प्राप्त केलेल्या तथागत तत्वदर्शींचा आहे. राजन, शरीर तर कुठे न कुठे जन्म घेत असते. आपला शुद्ध वंश तोच आहे जेथे तुमचे स्वरुप मला प्राप्त झाले आहे. राजन, आपल्या वंशाची हीच पंरपंरा आहे की श्रीमंत-गरिबांना सगळयांना भेटा, सर्वांकडून भिक्षा घ्या. त्यांचे सुख-दुःख जाणा. जो ज्या स्तरावर आहे तेथून त्याच्या विकासाची सुरुवात करावी व त्याचे कल्याण करावे. अशा महापुरुषाकडूनच सदैव कल्याण होत असते.'' राजा डोके धरुन खाली बसला. कारण राजाला असे वाटत होते की कुमार परत येईल. मग त्याला चुचकारुन, प्रेमाने समजावून त्याला राज्याभिषेक करु. पण येथे हा तर दलितांचे, अस्पृश्यांचे भोजन घेत बसला आहे.

सिद्धार्थाची पत्नी महाराणी यशोधरेने पुत्र राहुल याला सांगितले, ''राहुल, हे तुझे पिताश्री आहेत. त्यांच्याकडून पैतृक संपत्ती माग.'' राहुलने बुद्धांना सादर वंदन केले आणि पैतृक संपत्तीची मागणी केली. मंद स्मित करीत बुद्धदेव म्हणाले, ''वत्स, तू पैतृक संपत्ती घ्यायला खरोखर तयार आहेस का?'' राहुलने आपली अनुमती दिल्यावर ते म्हणाले, ''मातेकडून अनुमती घे.'' राहुलने आपल्या मातेकडे अनुमती मागितली. यशोधरेने विचार केला की राज्याची सीमा, दुर्ग-व्यवस्था, सैन्य संचालन, कोषाची सुरक्षा इत्यादी गोष्टी समजून घेऊन तयार होण्यासाठी राहुलला पुष्कळ वर्षे लागतील. तोपर्यंत बुद्धदेवांना येथे ठेवून घ्यायची ही चांगली संधी आहे. आणि म्हणून ती म्हणाली, ''पुत्र, तयार आहे म्हणून सांग.'' तीन वेळा राहुलकडून स्वीकारोक्ती घेतल्यानंतर भगवान बुद्ध म्हणाले, ''घरात जे वडील आहेत त्यानांही विचार'' राजा शुद्धोधनाला वाटले, पुत्राला पाहून याच्यात परिवर्तन येऊ लागलेले दिसत आहे. त्यामुळे त्यानेही सांगितले, ''राहुल, हो म्हण.'' शेवटी बुद्धदेवांनी राहुलला विचारले, ''तू स्वतः तयार आहेस ना? तू तर नकार देणार नाहीस ना?'' राहुल म्हणाला, ''नाही, कधीही नाही.'' अशा प्रकारे तीन वेळा स्वीकृती मिळाल्यावर बुद्धदेव म्हणाले, ''आनंद, या मुलाला भिक्षू बनव. तुझ्या पित्याने हीच संपत्ती प्राप्त केलेली आहे, ही संपत्ती स्थिर संपत्ती आहे, अक्षय आहे, हे तुझे स्वतःचे धन आहे. आणि ते प्राप्त केल्यानंतर आत्मा कायम तृप्त व समाधानी राहतो.'' राहुलने स्वतःला बुद्धदेवांच्या चरणी समार्पित केले. हे ऐकताच

यशोधरा राहुलकडे धावली, आजोबा बेशुद्ध पडले. परंतु राहुल म्हणाला, ''तीनदा मातेने होकार दिला, तीन वेळा आजोबांनी होकार दिला, मीही वचन दिले आहे. आता काहीही झाले तरी मी मागे हटणार नाही.'' राहुलने दीक्षा घेतली. यांना म्हणतात सद्‌गुरु, धर्मगुरु! ज्यांनी धर्म जाणला आहे त्यांना पुत्रमोह नसतो. एका बाजूला आचार्य द्रोण! एक गाय मिळवण्यासाठी किती उद्योग केले! अश्वत्थाम्याला मुकुट घालून त्यांना किती आनंद झाला. दुसरीकडे महामानव बुद्धदेव! ज्यांनी परंपरेने प्राप्त झालेला मुकुट मुलाच्या डोक्यावरुन उतरवला व त्याला भिक्षू बनवले. परमात्मा एक नुसती कल्पना असती तर बुद्धदेवांनी आपल्या पुत्राला भिक्षू बनवले असते का? परमात्म्याची प्राप्ती झालेले महापुरुष कोणाला चुकीच्या रस्त्याला भरकटू देत नाहीत. ते आपल्या मुलांना असे भरकटू देतील का?

गुरु नानक असेच श्रेष्ठ महापुरुष होऊन गेले. संसारी जीवनात त्यांना दोन पुत्र झाले होते. त्यांचा जेष्ठ पुत्र श्रीचन्द एक त्यागी पुरुष झाले. ते अविनाशीजींचे शिष्य बनले. त्यांनी उदासीन संप्रदायाची स्थापना केली. याचा अर्थ ते एका भिन्न मताचे प्रवर्तक होते असे नव्हे. कारण सर्वांचे मत एकच होते की ईश्वर एक आहे, त्याला प्राप्त करण्याची साधना पध्दती एक आहे. मात्र या महापुरुषांच्यानंतर त्यांच्या संगठित समाजाला 'उदासीन संप्रदाय' असे म्हणू लागले. गुरु नानकांचा दुसरा पुत्र लखमीचंद विलासी वृत्तीचा होता. त्यामुळे त्याला वाटे की आपल्या पित्यानंतर त्यांच्या गादीचे उत्तराधिकारीपद मलाच मिळायला हवे. गुरु नानकांना पुत्राच्या या इच्छेचा सुगावा लागला.

एक दिवस गुरु नानक सर्व शिष्यांना घेऊन जंगलात फिरायला गेले. फिरत असताना त्यांना डोक्यावर अवजड लाकडांचा भारा घेऊन झोकांड्या खात चालणारा एक लाकुडतोड्या दिसला. त्याला पाहून गुरु नानक म्हणाले, ''अरे रे! याला तर चालताना फार त्रास होत आहे असे दिसते. त्याचा लाकडाचा भारा कोणीतरी त्याच्या घरी पोहचवून या.'' ज्याच्याकडे गुरुजीनीं पाहिले तो मागे पाहू लागला. लखमीचंदाकडे पाहिले तर तोही दुसऱ्या शिष्याच्या मागे लपायला लागला. नानकांनी अंगददासाकडे पाहिले, तोंडाने काही सांगण्यापूर्वीच अंगददास पुढे आला, गुरुदेवांपुढे मस्तक टेकले आणि त्याने लाकूडतोड्याचा भारा आपल्या डोक्यावर घेतला. लाकूडतोड्या भारा द्यायला तयार नसतानाही अंगददासाने

त्याच्याकडून भारा घेतला व त्याच्या घरी पोहचवून आला व त्याने गुरु नानकांना येऊन वंदन केले.

संध्याकाळी गुरु नानकांनी सर्व शिष्यांची एक सभा बोलवली आणि सभेला उद्देशून म्हणाले, ''ही गादी केवळ प्रतिष्ठेची किंवा मौजमजा करण्यासाठी नाही. दुसऱ्याचा भार किंवा ओझे आपल्या डोक्यावर घेऊन ते त्याच्या जो घरी पोहचवतो म्हणजे दुसऱ्याचे दुःख हलके करतो त्याच्यासाठी ही गादी आहे. आजपासून अंगददास या गादीचा उत्तराधिकारी आणि तुम्हा सर्वांचा गुरु आहे.'' नंतर त्यांनी नारळ व बत्ताशासह अंगददासाला चादर अर्पण केली व स्वतः मक्का-मदीनेकडे भ्रमण करण्यासाठी निघून गेले. सद्गुरुने पुत्राची उपेक्षा करुन आपल्या गादीवर योग्य उत्तराधिकारी नेमला.

महापुरुष कोणाचा प्राण घेत नाहीत किंवा कोणाचा अंगठाही मागत नाहीत किंवा कोणाच्या मर्यादा कुठपर्यंत आहेत हे जाणण्याचेही त्यांना प्रयोजन नसते. **'साधु ते होई न कारज हानी.'** त्यांच्याकडून काधीही कोणाचे अनिष्ट होत नाही. गोस्वामी तुलसीदास म्हणतात- **''संत हृदय नवनीत समान कहा। कहा कविन्ह पर कहइ न जाना।। निज परिताप द्रवइ नवनीता। पर दुःख द्रवही सन्त सुपुनीता।।** परहित हा संताचा स्वभाव असतो. इतकेच नव्हे तर **खल सन इवपर बन्धन करई। खाल कढाइ विपति सही मरइ।। भूर्ज तरु सम सन्त कृपाला। परहित नित सह विपति विशाला।।** संत भुर्जपत्राप्रमाणे परहितासाठी आपली चामडी उतरवायलाही मागेपुढे पाहत नाहीत. त्यांच्या आचरणाचे अनुकरण म्हणजे धर्माचरण असते. सत्याचे आचरण करणारे सद्गुरु हेच खरे धर्मगुरु असतात.

एकदा घाबरुन गेलेला देवराज इंद्र दधीचीकडे गेला. कातर स्वरात तो म्हणाला, ''भगवन, इंद्रपदावरुन मी पदच्युत झालो आहे. आता तर जीवनपण कठीण झाले आहे, राक्षस वृत्रासूर कोणत्याही प्रकाराने मरतच नाही. आता आपणच दया करा.'' दधीची म्हणाले, ''तुझ्या हितासाठी मी काय करु देवेन्द्र?'' इंद्राने सविनय सांगितले, ''भगवान, आपली हाडे मला द्या. या तपःपूत हाडांचा प्रहार तो राक्षस सहन करु शकणार नाही. आता त्याला मारण्याचा अन्य कोणताही उपाय मला दिसत नाही.'' दधिची म्हणाले, ''जर सगळ्यांचे हित

यातच असेल तर ही घे माझी हाडे.'' असे म्हणून त्यांनी प्राणत्याग केला. त्यांच्या हाडापासून बनलेल्या वज्राने वृत्रासूर मारला गेला. या प्रकारे जरुर पडली तर महापुरुष शिष्यांसाठी आपले प्राणही देतात.

भगवान महावीरांनीदेखील आपल्या शिष्यांच्या कल्याणासाठी आपली इहलोकाची यात्रा संपवली होती. त्यांच्या जीवनकाळातच त्यांचे जवळजवळ तीस हजार विरक्त शिष्य होते. त्यांचा गोशाल नावाचा एक शिष्य तर भवपार झालेला होता; पण गुरु महाराजांच्या चरणसेवेत सतत मग्न राहायचा. महावीरांना वाटायचे की एकांतात ध्यान-चिंतन करुन त्याने आत्म्यात विलीन व्हावे. पण तो ऐकायचा नाही. एक दिवस महावीरांनी विचार केला की हा समजावून ऐकत नाही. कैवल्यप्राप्तीसाठी थोडेसेच अंतर राहिले आहे; पण हा त्या रस्त्याने न जाता भटकत बसला आहे. तेव्हा महावीरांनी त्याला बोलवले व ''भिक्षा मागायला जा'' असे सांगितले. तो भिक्षा मागायला गेल्यावर इतर शिष्यांना काही गोष्टी सांगून ते झोपले ते परत कधीच उठले नाहीत. त्यांनी आपल्या शरीराचा त्याग केला. शिष्य परत आला. गुरुदेवांचे पार्थिव शरीर पाहून तो खूप रडला. मग थोडा शांत झाल्यावर इतर शिष्यांना त्याने विचारले, ''गुरुदेवांनी मला काही सांगितले आहे का?'' शिष्य म्हणाले, ''हो, गुरुदेव म्हणाले की तू तर भवपार झालेला आहेस. तरीही डबकाभर पाण्यात बसला आहेस. शांत एकांतात बसून चिंतन कर. ध्यानात बैस आणि पार होऊन जा.'' शिष्याने विचार केला व शांत एकांतात तो ध्यानाला बसला व पंधरा वीस दिवसांतच त्याला कैवल्यपदाची प्राप्ती झाली. त्या महापुरुषाने विचार केला की थोड्यासाठी आपल्या या शिष्याला पुन्हा एक-दोन जन्म घ्यावे लागतील तेव्हा याच्या कल्याणासाठी या शरीराचा त्याग करुन इहलोकाची यात्रा संपवलीच पाहिजे असा विचार करुन महावीरांनी शरीर त्याग केला.

भगवान महावीरांच्या चोवीस जन्मांचा उल्लेख मिळतो. अगदी सुरुवातीला ते लाकडे तोडणारे सामान्य लाकुडतोड्या होते. आदिवासी लोकांप्रमाणेच त्यांची राहणी-करणी होती. पण एक दिवस एका संताला त्यांनी पाहिले आणि त्या संताकडे ते तासन्तास पहातच राहिले. त्या संताचेच चिंतन सतत करत राहिले. या पुण्यामुळे पुढील जन्मात त्यांनी दोन संतांना (महापुरुषांना) भिक्षा दिली.

तिसऱ्या जन्मात ते संत झाले. नंतर ते ब्राह्मण कुळात जन्मले. एकदा तर ते नरकातही जाऊन आले. एकदा ते वाघाच्या जन्माला आले. एकदा ते उच्च प्रतीचे दंडी बनले आणि चोविसाव्या जन्मात ते तीर्थंकर म्हणजे स्वतः पवित्र व दुसऱ्यांना पावन करण्याची क्षमता धारण केलेले महापुरुष बनले. अरिहंत म्हणून प्रसिद्ध झाले. अरिहंत म्हणजे जो शत्रूपासून मुक्त आहे व जो दुसऱ्यांच्या शत्रूचा नाश करु शकतो तो. त्यांनी आपला अलग धर्म स्थापला असे म्हणणे चुकीचे आहे. गीतेचा धर्म त्यांचा धर्म आहे.- आत्मशुद्धी करणात् धर्म। आत्म्याची शुद्धी करणे हाच धर्म होय. एका राजाने त्यांना विचारले की हा आत्मा कसा शुद्ध होईल? तेव्हा ते म्हणाले, ''दर्शन ज्ञान चरित्राणि'' तीर्थंकर महापुरुषांचे दर्शन, त्यांच्याकडून ईश्वराचे ज्ञान प्राप्त करणे व त्यानुरुप तपाचरण करुन सत् चरित्र बनवणे हाच त्या धर्माचा खरा अर्थ आहे. ईश्वरप्राप्ती झालेले सर्व महापुरुष असे तीर्थस्वरुप असतात.

**जड चेतन मग जीव घनेरे। जिन्ह चितये प्रभु जिन्ह प्रभू हेरे।। ते सब भये परम पद जोगू। भरत दरस मेरा भव रोगू।** (रामचरित मानस, अयोध्याकांड, दोहा २१६/१-२) जड-चेतन जो कोणी ईश्वराला पाहतो तो परमपदाचा अधिकारी होतो. तसेच कोणी ईश्वराला पाहो की न पाहो, पण ज्या ज्या कोणावर ईश्वराची दृष्टी पडते तोही परमपदाचा अधिकारी बनतो. रामाच्या दर्शनाने तुलसीदासजी परमपदाचे अधिकारी झाले. भरताच्या दर्शनाने भवरोग नाहीसा झाला. म्हणजे अनुभव जागृत झाल्यावर विज्ञानरुपी राम भेटतो व नंतर या जागृतीबरोबर परमपदाचा सूत्रपात होतो. चिंतनात अनुभव जागृत होतो व साधक तेव्हा भान हरपून ध्यानात -चिंतनात मग्न होतो तेव्हा हृदयरुपी गुंफेत चिंतनात आपल्या साध्या डोळयांनीदेखील ईश्वराला पाहू शकतो. पण ही जागृती सद्‌गुरुशिवाय कोणीही देऊ शकत नाही. हे सद्‌गुरु म्हणजे खरे धर्माचार्य आहेत. या सद्‌गुरुच्या आचरणाचे अनुकरण म्हणजेच धर्माचरण होय. समाजाची व्यवस्था लावणारे व्यवस्थापक सांगतात तो धर्म नव्हे. ती केवळ जीवन सुखद करण्याची पद्धत आहे, खरे धर्माचरण नव्हे.

असे सद्‌गुरु कोणाचा अंगठा मागत नाहीत. भगवान शिवाचे उदाहरण घ्या. ते आदिगुरु आहेत. अनादि असणारा योग मानवमात्रासाठी त्यांनीच सुलभ

केला आहे. म्हणून त्यांना भूतनाथ असेही म्हणतात. भूत म्हणजे प्राणी. ते प्राणिमात्रांचे शरणस्थान आहेत. ते आशुतोष आहेत. त्यांचा एक असुरभक्त तपश्चर्या करीत होता. त्याच्या तपश्चर्येवर भोलेनाथ खुश झाले. त्या असुरभक्ताला म्हणाले, ''वत्सा वर माग.'' तो म्हणाला. ''ज्याच्या डोक्यावर मी हात ठेवेन तो मरुन जावा.'' तथास्तु'' म्हणून भोलेनाथांनी आपल्या हातातील कडे त्याला दिले. नारदमुनी दूर उभे राहून हे दृश्य पाहत होते. त्यांनी विचार केला की हा असुर या शक्तीचा उपयोग करेल तर समाजावर मोठे संकट येईल. तेव्हा ते संकट दूर करण्याची योजना करुन त्या असुरराजाजवळ पोहचले व म्हणाले, ''असुरराज, आपल्यासारखी तपस्या आजपर्यंत कोणी केली नाही व असे वरदानही मिळवलेले नाही. असुरराज, आपण अजेय आहात. आता आपला इरादा काय आहे?'' असुरराज म्हणाला, ''प्रथम इंद्राला हटवेन व त्याच्या सिंहासनावर बसेन. सर्वांत सुंदर असणाऱ्या स्त्रीला महाराणी बनवेन.'' त्यावर नारदमुनी म्हणाले, अरे, त्रैलोक्यसुंदरी तर शंकर भगवानच्या शेजारी बसली आहे. ''त्या शंकरानी तर मला वरदान दिले आहे! त्याची इतकी कृतघ्नता!'' नारदमुनी म्हणाले, ''असुरराज, शक्ती तर कड्यामध्ये होती. शंकरात आता काय आहे? येथेच नष्ट करशील तर तुला शक्तिमान कोणी केले हे कोणाला कधी कळणारही नाही. म्हणजे तुला दिलेल्या वरदानाची परीक्षाही होईल व तुला कळेल की शंकराने तुला दिलेले वरदान खरे आहे की खोटे?'' असुरराजाने भोलानाथांचा पाठलाग सुरु केला. इकडे श्रीविष्णूने मोहिनीचे रुप धारण केले व असुरराज भस्मासुराच्या वाटेत उभे राहिले. भस्मासुराची दृष्टी तिच्याकडे जाताच भस्मासुर उभा राहिला. व मनात विचार करु लागला की नारदजीने ज्या त्रैलोक्यसुंदरीची गोष्ट केली होती ती हीच असावी; पण ही तर तिच्यापेक्षा सुंदर दिसत आहे. त्याने त्या सुदंरीला विचारले, ''देवी, आपण येथे का विचरण करत आहात?'' मोहिनीने सांगितले, ''मी चांगल्या वराच्या शोधात आहे, स्वयंवर करणार आहे.'' भस्मासुराने विचारले, ''स्वयंवरासाठी कोणती कसोटी आपण निर्धारित केली आहे?'' तेव्हा मोहिनी म्हणाली, ''माझ्याप्रमाणे नृत्य करुन जो मला नृत्यात हरवेल त्याला मी वर म्हणून निवडेन. भस्मासुर मोहिनीबरोबर नाचू लागला. नाचात तो इतका दंग झाला की शंकराने दिलेल्या कड्याचा प्रभाव तो विसरुन गेला आणि मोहिनीने स्वतःच्या डोक्यावर हात ठेवताच त्यानेही स्वतःच्या डोक्यावर तसाच हात ठेवला व तेथेच जळून भस्म

झाला. स्वतःश्रीविष्णूंनी मोहिनीचे रुप घेऊन ''भस्मासुराला मारुन टाकले; पण भगवान शंकरांना त्याचा काही पत्ताच नव्हता. ते इतके भोळे होते की भक्ताने जे मागितले ते देऊन टाकले. त्याचा परिणाम म्हणजे त्यांचे जीवन संकटात सापडले.

हीच ऋषींची परंपरा श्रीरामचंद्रांनी चालवली. वनवासाला निघताना प्रथम रामाला केवट भेटला. समाजाने त्याला अधम समजलेले असले तरी राम त्याला कडकडून भेटला व भरताप्रमाणे त्याला बंधूचा मान दिला. राम पुढे गेले तर त्यांनी भील्ल, वानर, अस्वल, **''गीध अधम खग आमिष भोगी। गति दीन्ही जेहि जाचत जोगी।।''** असुर, आदिवासी अशा लोकांना जवळ केले. त्यांच्याबरोबर राहिले, त्यांच्याबरोबर भोजन घेतले व त्यांना आत्मियतेने वागवले. सीतेचा शोध करीत असताना श्रीराम शबरीच्या आश्रमात गेले. शबरी आपला परिचय देताना म्हणाली, ''**अधम ते अधम अति नारि। तिन्ह महँ मैं मतिमन्द अघारी।।** मी एक अधमाहून अधम जातीची भील्ल समाजातील, त्यातून स्त्री व त्यातून मंद बुद्धीची- **कह रघुपती सुनु भामिनी बाता। मानऊँ एक भगति कर नाता।''** यावर श्रीरामचंद्र म्हणाले, ''शबरी, तू कुठे जन्मली आहेस, तुझे पूर्वज काय करत होते या गोष्टींशी माझा काहीच संबंध नाही. मी तर फक्त भक्तीचे नाते जाणतो. भक्ती नऊ प्रकारची आहे- **''प्रथम भगति सन्तन्ह कर संगा। दूसरि रति मम कथा प्रसंगा।।** या प्रकारे नवविधा भक्ती सांगून ते पुढे म्हणाले, की या नऊ भक्तीपैकी एक जरी भक्ती कोणाजवळ असली मग स्त्री असो की पुरुष असो की इतर कोणताही प्राणी असो तो भक्त मला स्वतःच्या प्राणांइतकाच प्रिय असतो. **सकल प्रकार भगति दृढ तोरे** या सर्व प्रकारात तुझ्याजवळ दृढ भक्ती आहे.'' शबरीला अत्यंत आनंद झाला. पानामध्ये ती रामासाठी बोरे घेऊन आली. रामाने ती आनंदाने खाल्ली व म्हणाले, ''शबरी, तू मत स्वरुपात विलीन हो'' लोक म्हणतात की शबरीने रामाला उष्टी बोरे दिली पण ईश्वराप्रत गेलेल्या भक्तांचे मुख व भगवंताचे मुख एकच असते. म्हणजे भक्त ईश्वरचरणी इतका तादात्म्य पावलेला असतो की ईश्वराशिवाय त्याला दुसरे अस्तित्व नसते. त्यामुळे तेथे उष्टी व शुद्ध हा भाव नसतोच. रामाने शबरीचा उद्धार केलेला बघून शबरीचा द्वेष करणारे अन्य गुरुबंधू तिच्यापुढे नतमस्तक झाले. ते नुसते बघत राहिले व शबरीला अद्वैत प्राप्त झाले. खरोखर ईश्वर फक्त श्रद्धेचा-भक्तीचा भुकेला असतो. महापुरुषही केवळ श्रद्धेचे-भक्तीचेच नाते जाणत असतात.

भक्त शिरोमणी हनुमान तरी कुठे कुलीन होते? **''कहड कवन मैं परम कुलीन। कवि चंचल सबही विधि हीना।।''** हनुमान वानर जातीतील पुरुष होता. हैहय, ऋक्ष, वानर, मण्डूक इत्यादी त्यावेळच्या प्रचलित जाती होत्या. **''अस मैं अधम सखा। सुनु, मोहूँ रघुवीर। कीन्ही कृपा सुमिरि गुन, भरे विलोचन बीर।।** हनुमान बिभीषणाला म्हणतो, ''बिभीषणा. मी इतका अधम जातीचा आहे की प्रातः काली माझे कोणी नाव घेतले तर त्या दिवशी त्याला भोजन मिळत नाही. पण अशा अधम जातीच्या माझ्यावर प्रभू रामचंद्रांनी कृपा केलेली आहे. आपण तर राजकुळातील आहात. आपण प्रभूला शरण जावे.'' हनुमंताने बिभीषणाला रामचंद्राना शरण जाण्यास प्रेरित केले. हनुमानजी कुमारी स्त्रीचा पुत्र होता त्यामुळे मोठा झाल्यावर, कोणी त्याला पवनसुत म्हटले, कोणी केशरीनंदन म्हटले तर कोणी शंकर सुवन म्हटले. पण कबीर मिळाले तसे कोठेही पडलेले का न मिळो, मानव शरीर दुर्लभ आहे. शरीर अधम नसते, गीतेच्या सांगण्यानुसार जो धर्माच्या नावावर मनमानेल तसे वागतो, कृती करतो तो अधम असतो, सृष्टीमध्ये अन्य कोणीही अधम नसते.

महापुरुष कोणाचा अंगठा कापून मागत नाहीत. उलट भक्ताच्या प्राणरक्षणासाठी गरज पडली तर स्वतःचा प्राणही द्यायला तयार होतात. रावणाने जेव्हा बिभीषणावर प्राणान्तक शक्तीचा प्रहार केला तेव्हा **''तुरन्त बिभीषण पाछे मेला। सन्मुख राम सदेह सोई सेला''।।** श्रीरामाने त्याक्षणी बिभीषणाला मागे ढकलले व शक्तिप्रहार स्वतःवर झेलला. सद्‌गुरु असे असतात. ते अंगठा तर घेतच नाहीत पण ते प्राणांचे रक्षण करतात. **''सत्य वस्तु है आत्मा, मिथ्या जगत प्रसार। व्यापक एक अह्म अविनाशी। सत चेतन घन आनन्द राशी।''** परमात्माच सत्य आहे. जो या सत्याला जाणतो व त्याचे ज्ञान दुसऱ्याला देतो तो सद्‌गुरु असतो. गरज पडली तर सद्‌गुरु भक्तासाठी आपले प्राण देतात, भक्ताचा भार स्वतःच्या डोक्यावर घेतात आणि जेव्हा भक्ताचा ते स्वीकार करतात तेव्हा स्वतःची भगवत्ता त्याला देतात.

**''दुर्योधन घर मेवा त्यागे साग विदुर घर खाये.''** ईश्वर मेवा खायला घातल्याने खुश होत नाहीत तर भक्ताची श्रद्धा व भाव बघून ते प्रसन्न होत असतात. विदुराच्या पत्नीने श्रीकृष्णाला पाहिले व एकदम इतकी भावविव्हल

झाली की केळे खाली टाकून साल श्रीकृष्णाला खायला घालू लागली. जेव्हा विदुराने तिची उलटी कृती तिच्या लक्षात आणून दिली तेव्हा श्रीकृष्णाला ती सालीऐवजी केळी खायला देऊ लागली. यावर श्रीकृष्ण म्हणाले, ''काका, या केळ्यांच्या सालीत शबरीच्या बोरांचा स्वाद होता. माता यशोदेच्या लोण्यातला स्वाद होता. तो स्वाद आता या केळ्यात नाही.'' सारांश, ईश्वराच्या भक्तीसाठी खूप व्यवस्थितपणाची जरुर नसते. गीतेमध्ये भगवंत म्हणतात, **''पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति।''** पान, फुल, फळ, पाणी किंवा जे मिळेल ते अत्यंत श्रद्धेने अर्पण करतो, त्याचे मी परम कल्याण करीत असतो. त्याच्यासाठी पक्वान्नाची किंवा देखाव्याची आवश्यकता नाही. मी फक्त भक्ताच्या श्रद्धेचा, भावाचा भुकेला असतो. **''श्रद्धावाँल्लभते ज्ञानं तत्परः संयतेन्द्रियः।''** गीता

भगवान श्रीकृष्णाच्या अंतरंग भक्तीमध्ये नन्दा नावाचा न्हावी दुर्योधनाची सेवा करीत असे. आधुनिक ब्युटीपार्लरप्रमाणे त्यावेळीही युवराजाला तयार करुन राज्यसभेत घेऊन जाण्याची आणण्याची सेवा नंदा करीत असे. एक दिवस सकाळी तो दुर्योधनाच्या सेवेसाठी जात असताना वाटेत विसरुन गेला. संताना स्नान घालण्यात, भोजन देण्यात दुपार टळून गेली. जेव्हा संत निघून गेले तेव्हा नंदाला आपल्या कामाची आठवण झाली. तो विचार करु लागला ''दुर्योधन खूप दुष्ट आहे. मृत्युदंडशिवाय त्याने कोणाला दुसरी शिक्षा दिलेली नाही. आज मला तीच सजा मिळणार यात शंका नाही. चला, चांगलेच आहे. हे नश्वर शरीर कधी ना कधी नष्ट होणार आहे. ते आज संताच्या सेवेच्या कामी तर आले! ईश्वराच्या थोडे उपयोगी तर पडले!''

अशा विचारात दंग झालेला नंदा राजभवनात आला. दारातच दुर्योधन भेटला. त्याने नंदाला पाहताच समोरुन विचारले, ''अरे, नंदा परत का आलास? आता तर घरी गेला होतास.'' नंदाला वाटले की दुर्योधन मुद्दाम वाकड्यात जाऊन असे म्हणत आहे. तोपर्यंत काही मंत्री तेथून चालले होते ते म्हणाले, ''अरे नंदा, परत का आलास? काही विसरले का? आज तुझ्या चेहऱ्यावर जी मोहिनी होती ती आम्ही कधीच विसरणार नाही.'' दुर्योधन म्हणाला, ''नंदा, आज तुझ्या हातांचा कोमल स्पर्श मी कधीच विसरणार नाही. आज तुझ्या हातात जादू होती. आजच्या अविस्मरणीय सेवेबद्दल काही वर मागून घे.''

आता नंदाच्या लक्षात आले, ''अरेरे! माझ्या सारख्या क्षुद्र प्राण्याच्या रक्षणासाठी माझ्या भगवंताला माझे रुप घेऊन या अधम माणसाचे पाय दाबावे लागले.'' अत्यंत व्यथित होऊन तो दुर्योधनाला म्हणाला, ''युवराज, मला वरच द्यायचा असेल तर मी जो वर मागेन तो वर मला द्यावा.'' दुर्योधन म्हणाला, ''अरे तू जे मागशील ते देईन. मी कर्णाला राजा बनवले तसा तुलाही राजा बनवू?'' नंदा म्हणाला, ''कृपया माझा राजीनामा स्वीकारण्याची मेहरबानी माझ्यावर करावी. आता राहिलेले जीवन ईश्वराचे सेवेत मी घालवू इच्छित आहे.''

**'आप बने हरि नाई नन्दा''** नंदाने मी संकटात आहे, माझ्या प्राणांचे रक्षण करा.'' असे मोठ्या आवाजात कधीही भगवंताला सांगितले नाही. परंतु कोणता भक्त कोणत्या संकटात आहे हे ईश्वर जाणतो. त्याला काही सांगण्याची आवश्यकता नसते. मूर्ख आणि अज्ञानी माणसाला समजवावे लागते. ईश्वर तर पहिल्यापासूनच सर्व काही जाणत असतात. द्रौपदीने ''माझी अब्रू वाचवा'' असा आक्रोश केला पण अर्जुन हताश होता. काही करु शकला नाही. ''आपल्यासारखा सारथी असून जयद्रथाला मारण्याची माझी प्रतिज्ञा पूर्ण झाली नाही. याचा अर्थ ईश्वर काही करु शकत नाही. भाग्यच श्रेष्ठ असते, असे अर्जुनाला वाटले. तशी परिस्थिती नंदाची ही होती परंतु तो म्हणाला, **''चीटी के पग नूपुर बाजै वह भी साहिब सुनता है''** आपण लोक संकल्प नंतर करतो. ईश्वर तर प्रथमपासूनच सर्व काही जाणत असतो. आणि म्हणूनच महापुरुष आपल्या भक्ताचे-शिष्याचे कधी प्राण घेत नाहीत. ना कधी त्याला त्याचा अंगठा मागत. त्याला कधी मर्यादा घालत नाहीत, परंतु भक्तावर आलेले संकट स्वतःवर घेतात. इतकेच नव्हे तर **''बेंचे तो बिक जाऊँ''** भक्ताने जर ईश्वराला विकायचे ठरवले तर ईश्वर म्हणतात, ''मी भक्तासाठी विकला जायला तयार आहे.''

अत्यंत निष्ठेने व समर्पित भावनेने ईश्वराचा धावा करण्यासाठी दोन किंवा अडीच अक्षराच्या राम किंवा ओमचा किंवा यासारख्या इतर कोणत्याही नामाचा आपण सर्वांनी जप करावा. उठता-बसताना, चालताना-फिरताना, घरकाम करताना, वाचताना-लिहिताना म्हणजे प्रत्येक क्षणी त्या नावाचे स्मरण करा. सकाळ-संध्याकाळा अर्धा तास किंवा पंधरा-वीस मिनिटे नाम-जपासाठी अवश्य काढा. असे कराल तेव्हा ईश्वर तुमच्या पाठीशी राहील. कारण भक्त माझा धावा

करीत आहे हे ईश्वर जाणतो व त्यामुळे तुमची अडचण दूर करुन तुमचे कल्याण ज्यात आहे त्याप्रमाणे ईश्वर तुमची व्यवस्था करतो.

आम्हांला केवळ अतीव निष्ठेने व समर्पित भावनेने ईश्वराचे स्मरण करायला हवे. ईश्वर एकच असतो. दुसरा असूच शकत नाही. **व्यापक ब्रम्ह एक अविनाशी सत चेतन घन आनन्द राशी।।** हा ईश्वर राहतो कुठे? **अस प्रभु हृदय अछत अविकारी। सकल जीव जग दीन दुखारी।।** "ईश्वर भक्ताच्या हृदयात राहतो. ईश्वर कसा प्राप्त होईल? कसा प्रकट होईल?" तर **नाम निरुपण नाम यतन ते। सोई प्रकटत जिमि मोल रतन ते।।** हे ईश्वर नाम आहे कसे त्याचे प्रथम ज्ञान करुन घ्या व मग प्रयत्न करा; ईश्वर तुमच्या हृदयात अवश्य प्रकट होईल.

सामाजिक आचार्यांची म्हणजे शिक्षकांची तुलना सद्‌गुरुच्या बरोबर करणे ही धार्मिक भ्रांती आहे. धर्म म्हणजे सद्‌गुरुजी उपज आहे. सद्‌गुरु सत्याला जाणतात व सत्यातच समाहित झालेले असतात. हे सद्‌गुरु सर्वांचे असतात ते कोणाला अंगठा मागत नाहीत पण जरुर पडली तर स्वतःचे प्राणही ते देतात. गीता हे आपले धर्मशास्त्र आहे. तेव्हा 'यथार्थ गीता' हे गीतेवरील आमचे भाष्य अवश्य वाचावे.

**।। सद्‌गुरुदेव भगवान की जय ।।**

**ॐ**

# शास्त्र

पूर्वी सर्व शास्त्रे मुखोद्गत केली जात असत. शिष्य परंपरेत ही शास्त्रे मुखोद्गत करुन घेतली जात असत. पूर्वी शास्त्रे पुस्तक स्वरुपात नव्हती. आजपासून पाच हजार वर्षांपूर्वी वेदव्यासांनी ही शास्त्रे लिपीबद्ध केली. चार वेद, महाभारत, गीता इत्यादी महत्वपूर्ण ग्रंथांच्या संकलनाचे श्रेय व्यासानांच जाते. भौतिक तसेच आध्यात्मिक ज्ञान त्यांनी लिपीबद्ध केले; परंतु त्यांना त्यांनी शास्त्र ही संज्ञा दिली नाही. त्यांनी सांगितले- **गीता सुगीता कर्तव्या किमन्यै शास्त्र संग्रहै। या स्वयं पद्मनाभस्य मुख पद्माब्ज विनिःसृता।।** भगवान पद्नाभाच्या तोंडून निःसृत झालेली वाणी म्हणजे गीता होय. तेव्हा गीतेचे उत्तम प्रकारे मनन करुन हृदयात धारण करण्यास योग्य आहे. इतर शास्त्रांच्या विषयाबाबत विचार करण्याची किंवा त्यांचा संग्रह करण्याची आवश्यकता नाही. विश्वात प्राप्त करण्यायोग्य जे काही आहे ते सर्व गीतेत आहे. एका ईश्वराची लेकरे हा विचार गीतेतूनच घेतलेला आहे. गीतेविषयी अधिक जाणण्यासाठी यथार्थ गीता अवश्य वाचावी.


अर्थ-धर्म-स्वर्गोपम सुख तसेच परमश्रेयाच्या प्राप्तीसाठी अर्थार्थी, आर्त जिज्ञासू व मुमुक्षुजनांनी **'यथार्थ गीता'** या ग्रंथाचे वाचन व मनन करावे.

निवेदकः- भक्तमंडळ


श्री परमहंस आश्रम

शक्तेशगढ, चुनार मिर्जापुर(उ.प्र.)


# आमची प्रकाशने





**यथार्थ गीता–**
'यथार्थ गीते' मध्ये श्रीकृष्णांच्या वाणीचा आशय चांगल्या प्रकारे, जसाच्या तसा समजाविला आहे. ही एक कालजयी कृति आहे
२८ भाषांमध्ये





**अंग क्यों फडकते हैं और क्या कहते हैं?–**
मानवी शरीराच्या विभिन्न भागांमध्ये होणाऱ्या स्पंदनांचे कारण आणि त्याद्वारे मिळणाऱ्या संकेतांचे विश्लेषण केले गेले आहे की जे साधना करताना सहाय्यक ठरते.
४ भाषांमध्ये





**जीवनादर्श एवं आत्मनुभूति–**
पूज्य गुरु परमहंस स्वामी श्री परमानंदजी महारांजांचे जीवन चरित्र, त्यांचे अनुभव तसेच त्यांच्या उपदेशांचे संकलन केले आहे. साधकांसाठी हा अतिशय उपयुक्त ग्रंथ आहे.
४ भाषांमध्ये.



**अनाकलनीय प्रश्न**
वर्ण, मूर्तिपूजा, ध्यान, हठ, चक्र–भेदन आणि योग अशा विषयांचे स्पष्टीकरण करुन, भ्रमात असले–ल्या समाजाला मार्गदर्शन केले आहे.
३ भाषांमध्ये




**शंका समाधान–**
समाजामध्ये प्रचलित असलेल्या सर्व वाईट रिती, रुढि, आवडंबर आणि अंधविश्वास ह्याबद्दल असलेल्या शंकांचे निरसन केले आहे
५ भाषांमध्ये.



**एकलव्याचा अंगठा–**
शिक्षण देणारा गुरु आणि सद्गुरु मधील फरक सांगितला आहे. शिक्षक हा लोकजीवनाची कला शिकवितो तर सद्गुरु जीवनामध्ये समृद्धि बरोबरच परम श्रेयाची जागृति आणि त्या परमपदाची प्राप्ति करवितो ज्यामुळे मनुष्याचा जन्म–मरणाच्या चक्रातून मुक्ति मिळते.
३ भाषांमध्ये.




**भजन कोणाचे करावे?**
धर्माच्या नावावर गाय, पिंपळ, देवी–देवता, भूत–भवानी ह्यांची पूजा लोक करीत आहेत. प्रस्तुत पुस्तकात ह्या सर्व भ्रांतिंचे निवारण करुन स्पष्ट केले आहे की सनातन धर्म कोणता? इष्ट म्हणजे कोण? साधना कोणाची करावी व कशी करावी?
६ भाषांमध्ये.



**षोडशोपचार पूजा पद्धति–**
ह्या पुस्तकामध्ये हे सांगितले गेले आहे की एका परमात्म्यावर श्रद्धा स्थिर ठेऊन, त्या एका परमात्म्याचे चिंतन करायला शिकविणे म्हणजेच कर्मकांड होय.
३ भाषांमध्ये.


# आमची प्रकाशने



**योगशास्त्रीय प्राणायाम–**

योगशास्त्रीय प्राणायाम मध्ये आपण सांगितले आहेत की यम, नियम आणि आसन साध्य होताच श्वास–प्रश्वासाचे शांत प्रवाहित होणे म्हणजेच प्राणायाम होय. प्राणायाम नावाची वेगळी अशी कोणती क्रिया नाही. ही योग–चिंतनाची एक अवस्था आहे. त्याचेच निरसन ह्या पुस्तकात केले गेले आहे.


**३ भाषांमध्ये.**




**बारहमासी –**

आपले पूज्य गुरु श्रीपरमानंदजी महाराजांना आकाशवाणीने प्राप्त झालेले भजन (ईश्वरीय गायन) बारहमासीचे संकलन तसेच त्याचे विवेचन केले आहे. ह्यामध्ये लक्ष्यापर्यंत पोहोचण्याचा प्रवेशापासून ते पराकाष्ठेपर्यंतचा मार्ग दाखविला आहे.


**हिंदी भाषेमध्ये.**




**योगदर्शन– प्रत्यक्षानुभूत**

व्याख्या– महर्षि पतंजलि कृत ह्या पुस्तकात सांगितले गेले आहे की ‘योग’ प्रत्यक्ष दर्शन आहे, तो लिहिता किंवा सांगता येत नाही. क्रियात्मक होऊनच साधकाच्या लक्षात येते की जे काही महर्षिंनी लिहीले आहे त्याचा वास्तविक अर्थ काय आहे? साधनेस उपयोगी असे पुस्तक आहे.


**३ भाषांमध्ये.**




**ग्लोरिज ऑफ योग–**

**हठ, चक्र, भेदन आणि योग, प्राणायाम, ध्यान ह्या बद्दल पूर्ण माहिती.**


**इंग्रजी भाषेमध्ये.**



**प्रश्न समाज के उत्तर गीता से–**

ह्या पुस्तकामध्ये सामाजिक, आध्यात्मिक तसेच धार्मिक असे कोणतेही प्रश्न असतील, त्यांचे गीतेच्या दृष्टि कोनातून निरसन केले आहे.

**हिंदी भाषेमध्ये.**



**अहिंसे चे स्वरुप–**

अहिंसा एक गुंतागुंतीचा प्रश्न आहे. मूळतः हा यौगिक, आंतरिक साधनेचा शब्द आहे. ह्या पुस्तकात आपल्याला दिसेल की आपल्या पूर्वीच्या महापुरुषांनी अहिंसेला कोणत्या संदर्भात घेतले.

**४ भाषांमध्ये.**

MP3 ऑडियो सिडिज



**६ भाषांमध्ये**

श्री स्वामीजींच्या मुखातून निःसृत अमृतवाणीचे संकलन व्हाल्युम १ ते ६० पर्यंत




**हिंदी भाषेमध्ये.**

**श्री परमहंस स्वामी अड़गड़ानन्द जी आश्रम ट्रस्ट**

न्यू अपोलो ईस्टेट, गाळा नं. 5, मोगरा लेन,(रेलवे सब-वे च्या जवळ), अंधेरी पूर्व,
मुम्बई - 400069 भारत. ● फोन : (091-22) 2825 5300
ईमेल : contact@yatharthgeeta.com ● वेबसाइट : www.yatharthgeeta.com